RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
अँड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. 3 एप्रिल 2026



1923- डॉ बाबासाहेब आंबेडकर डी.एस.सी.व बार अट लॉ पूर्ण करून लंडन वरून भारतात परतले.
1927- बहिष्कृत भारत चा पहिला अंक बाबासाहेबांनी प्रकाशित केला.
1955- चीन चे राष्ट्रपती यू चान दूनच्या सत्कारार्थ डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : ९४ | दैनिक | किंमत : ₹५/-
Friday, 3 April 2026 | Year : ६ | Issue : 94 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### युएपीए अंतर्गत कोठडीत असलेल्या अँड. सुरेंद्र गडलिंग जामीन प्रकरणात दुसऱ्या न्यायधिशाचीही माघार



**नागपूर :** 2016 मधील गडचिरोली जाळपोळ प्रकरणात अटक करण्यात आलेल्या अँड. सुरेंद्र गडलिंग यांच्या जामीन अर्जावरील सुनावणीत आज सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांनी स्वतःला सुनावणीपासून दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. हा अर्ज न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर सूचीबद्ध होता. यापूर्वी न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांनीही या प्रकरणातून स्वतःला दूर केले होते. यानंतर हे प्रकरण न्यायमूर्ती माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुरू होते. आजच्या सुनावणीत न्यायमूर्ती चांदूरकर यांनीही स्वतःला बाजूला घेतल्याने आता नव्या खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

### अमरावतीला आंध्र प्रदेशची कायमस्वरूपी राजधानी म्हणून वैधानिक मान्यता



**नवी दिल्ली :** राज्यसभेने गुरुवारी आंध्र प्रदेश पुनर्रचना (सुधारणा) विधेयक, 2026 मंजूर केले. हे महत्त्वाचे विधेयक अमरावतीला आंध्र प्रदेशची कायमस्वरूपी राजधानी म्हणून वैधानिक मान्यता देते. हे विधेयक या संदर्भात आंध्र प्रदेश विधानसभेने मंजूर केलेल्या ठरावाला कायदेशीर आधार देखील प्रदान करते. या विधेयकाला लोकसभेने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. विधेयक मंजूर करण्यापूर्वी सभागृहात चर्चा झाली.

# राज्यातील 433 शाळा अपात्र, कधीच अनुदान मिळणार नाही...

**वर्धा :** राज्यात खाजगी शाळा मोठया प्रमाणात चालविण्यात येतात. त्याचे काही निकष आहेत. ते पूर्ण केल्यास शालेय शिक्षण खाते अनुदान देणे सूरू करते. मात्र तसे निकष अपूर्ण असल्यास कारवाई पण होते. तसेच या शाळांबाबत झाले आहे. कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या वनंतर कायम शब्द वगळलेल्या या शाळा आहेत. या शासनमान्य खाजगी शाळा व तुकड्यांना मूल्यांकनाचे निकष व त्यानुसार अनुदान हे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. मात्र ठरलेल्या निकषनुसार वारंवार मूल्यांकन करूनही अपात्र ठरणाऱ्या शाळांबाबत एक तरतूद झाली.

पात्रता पूर्ण नं करणाऱ्या शाळांबाबत शासनाने एक कारवाई निश्चित केली आहे. एखादी शाळा सलग 3 वर्ष मूल्यांकणात अपात्र ठरल्यास त्या शाळेची मान्यता किंवा परवानगी आपोआप रद्द होईल. ज्या शाळा 2011 च्या शासन निर्णयातील तरतुदी पूर्ण करतात, तशी शासनाची खात्री झाली आहे, त्या शाळांना अनुदान अनुज्ञय राहील, असा सर्वोच्च न्यायालय (supreme Court) तर्फे निवाडा झाला आहे. पात्रतेच्या निकषावर पात्र ठरलेल्या शाळांना वेळोवेळी अनुदान लागू करतांना मूल्यांकणची संधी सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात आली होती, असे या 1 एप्रिल 2026 रोजी दिलेल्या आदेशात नमूद आहे. मात्र तरीही वारंवार अपात्र ठरलेल्या शाळांची परवानगी रद्द करण्याऐवजी अशा शाळांना मूल्यांकनाची संधी पुन्हा पून्हा देण्यात आली. मात्र या अपात्र शाळेत शिकणाऱ्या मुलांचे नुकसान होवू नये म्हणून विचार झाला. त्यानुसार 20 डिसेंबर 2022 रोजी परत मूल्यांकन संधी देण्यात आली. त्रुटीची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली. मात्र तरीही त्रुटी पूर्तता या शाळांनी केली नाही. त्यांना शासन निर्णय अखेर लागू झाला. पण या शाळांनी एक महिन्याच्या कालावधीत स्वयं अर्थसहायीत शाळा तुकडी म्हणून मान्यता घेण्याची मुभा देण्यात आली होती. मात्र अनुदानास अपात्र ठरलेल्या कोणत्याही शाळेकडून स्वयं अर्थसहायीत तुकडी देण्याची विनंती करण्यात आली नाही. कोणतेच अनुदान नाही या अश्या अपात्र व पुन्हा पुन्हा संधी देण्यात आलेल्या खाजगी



प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच वर्ग, तुकड्या व अतिरिक्त शाखा यांना शाळा अधिनियम अंतर्गत विवक्षित 'शाळा म्हणून मान्यता देण्याचे नमूद आहे. या शाळा किंवा तुकड्यांना कोणतेच अनुदान शासन देणार नाही. आता या शासन निर्णयानुसार या अपात्र शाळांना वेतन अनुदानासाठी कायम स्वरूपी अपात्र घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील 433 प्राथमिक शाळा व 33 तुकड्या अनुदानास अपात्र ठरल्यात. तसेच या शाळांना स्वयं अर्थसहायीत अधिनियमातील तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी अर्ज करण्यास 30 एप्रिल 2926 ही आता अखेरची मुदत देण्यात आली आहे. या अपात्र शाळात सर्वाधिक शाळा या मुंबई विभागातील आहे.

# इंधन उपलब्धतेवरून भाजप आणि काँग्रेस आमनेसामने



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, द्रवीकृत नैसर्गिक वायू (एलपीजी) आणि इतर इंधनांच्या उपलब्धतेवरून भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि काँग्रेस यांच्यात गुरुवारी खडाखडी झाली. बुधवारी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर या संकटाच्या परिणामाचा आढावा घेण्यासाठी सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) बैठक झाली. प्रधानमंत्री मोदी म्हणाले, पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या परिणामांपासून भारतीय नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. ते असेही म्हणाले की, अफवा आणि चुकीची माहिती थांबवणे आणि लोकांपर्यंत अचूक माहिती पोहोचवणे महत्वाचे आहे. प्रधानमंत्री कार्यालयाने (पीएमओ) जारी केलेल्या निवेदनानुसार, पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालये आणि विभागांनी आतापर्यंत कोणती पावले उचलली आहेत आणि पुढे काय करायला हवे, याचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या विषयावरील सीसीएसची ही दुसरी बैठक होती. पहिली बैठक 22 मार्च रोजी झाली होती. जागतिक परिस्थितीमुळे प्रभावित झालेल्या नागरिकांना आणि प्रदेशांना होणारा त्रास कमी करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्याचे निर्देश प्रधानमंत्र्यांनी सर्व संबंधित विभागांना दिले. इंधन पुरवठा आणि किमतींबाबतच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, सरकार परिस्थिती सक्रियपणे हाताळत असल्याचे भाजपने म्हटले आहे. मात्र, तळागाळापर्यंत एलपीजी आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या उपलब्धतेवर काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेसने कोणते प्रश्न उपस्थित केले? इंधन प्रत्यक्षात उपलब्ध नसल्याचे सांगत काँग्रेसने सरकारच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम म्हणाले, 'जर संकट असेल, तर त्याचा परिणाम जमिनीवर दिसला पाहिजे. ग्राहकांमध्ये आत्मविश्वास असायला हवा आणि त्यांना मागणीनुसार स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल आणि डिझेल उपलब्ध व्हायला हवे. जर असे असेल, तर पंतप्रधान बरोबर आहेत. पण जर जनता त्रस्त असेल, तर सत्य वेगळे आहे.' काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी राजनैतिक प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विचारले की, सरकार किती काळ तात्पुरत्या उपायांवर अवलंबून राहणार आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी कोणते राजनैतिक प्रयत्न केले जात आहेत, असा प्रश्न त्यांनी विचारला. ते म्हणाले की, उत्पादन शुल्क कमी करून आणि सीमा शुल्क काढून टाकल्याने परिस्थिती तात्पुरती नियंत्रणात आणता येईल. पण हा कायमस्वरूपी उपाय नाही. होर्मुझची सामुद्रधुनी बंद असताना कच्च्या तेलाचा आणि वायूचा पुरवठा पुरेशा प्रमाणात कधी होईल, असा प्रश्नही त्यांनी विचारला. ते म्हणाले की, चीन, तुर्की आणि पाकिस्तानसह अनेक देश मध्यस्थी करत असून, भारत कोणती राजनैतिक पावले उचलत आहे, हे सरकारने जाहीर करावे.

# प्रशासकीय बदल्यांमध्ये असमतोल ? बौद्ध अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न ऐरणीवर




**मुंबई :** राज्यातील प्रशासकीय बदल्यांवरून सामाजिक समतोल आणि प्रतिनिधित्वाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, बौद्ध अधिकाऱ्यांना योग्य संधी देण्याची गरज अधोरेखित होत आहे.

राज्यात सुरू असलेल्या प्रशासकीय बदल्यांच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर बौद्ध समाजातील अधिकाऱ्यांवर अन्याय केल्याचे गंभीर आरोप करण्यात येत आहेत. महत्वाच्या पदांवर नियुक्ती करताना बौद्ध अधिकाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलले जात असल्याची भावना व्यक्त होत असून, या पार्श्वभूमीवर त्यांच्या न्याय्य प्रतिनिधित्वाची मागणी जोर धरत आहे.

सध्या राज्यात हर्षदीप कांबळे, विजय वाघमारे, धीरजकुमार, प्रशांत नारनवरे, प्रेरणा देशभ्रतार, निरुपमा डांगे, अनिल भंडारी, आशिष येरेकर, वैभव वाघमारे, सुहास लक्ष्मण गाडे आणि आदित्य चंद्रकांत जिवने यांसारखे अनेक बौद्ध अधिकारी विविध पदांवर कार्यरत आहेत. मात्र, या अधिकाऱ्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे महत्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या जात नसून, त्यांना दुय्यम स्वरूपाच्या पदांवर नियुक्त केले जात असल्याचा आरोप आहे.

गृह, महसूल, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, सिडको, म्हाडा, मेट्रो रेल कॉर्पोरेशन, महावितरण, महापारेषण, प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांसारख्या महत्वाच्या विभागांमध्ये या अधिकाऱ्यांना संधी दिली जात नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, 31 मार्च रोजी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदाची जागा रिक्त होत असून, त्या पदावर ज्येष्ठ सनदी अधिकारी हर्षदीप कांबळे यांची नियुक्ती करावी, अशी मागणी पुढे येत आहे. तसेच विजय वाघमारे, प्रशांत नारनवरे, प्रेरणा देशभ्रतार, आदित्य जिवने आणि वैभव वाघमारे यांसारख्या अधिकाऱ्यांच्या क्षमतेनुसार त्यांना अधिक जबाबदारीची पदे देण्यात यावीत, असेही मत व्यक्त केले जात आहे. सध्याच्या बदल्यांमध्ये अनेक आयएएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, काही बदल्या प्रक्रियेत आहेत. मात्र या प्रक्रियेत बौद्ध अधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. हे अधिकारी कार्यक्षम, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ असूनही त्यांना संधी नाकारली जात असल्याचे सांगण्यात येते.

या पार्श्वभूमीवर, सामाजिक न्यायाचा मुद्दा उपस्थित करत टीकाकारांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, सरकारच्या धोरणांमध्ये प्रत्यक्षात समावेशकतेचे तत्त्व कितपत पाळले जात आहे? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बौद्ध अधिकाऱ्यांना महत्वाच्या पदांवर नियुक्ती देऊन सामाजिक न्यायाच्या तत्वांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.




(लखनऊ), अँड. सोनेलाल गौतम (कानपूर), नेत्रपाल बृजवासी 'बहुजन राष्ट्रकवी' (मथुरा), किरण चौधरी (प्रयागराज), टी. आर. राही, हरगोविंद जोहरी (मुरैना), इरशाद सैफी (राष्ट्रीय प्रवक्ता, ऑल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज) आदींचा समावेश होता.

याप्रसंगी ए. आर. अकेला (अलीगड) यांनी संपादित केलेल्या कांशीराम यांच्या भाषणांच्या इंग्रजी अनुवादाच्या भाग-1 चे प्रकाशनही झाले. यावेळी त्यांनी कांशीराम यांच्या विचारांचा प्रसार देशातील सर्व भाषांमध्ये करण्याचा संकल्प

# बहुजन आंदोलनाच्या आव्हानांवर सखोल चर्चा

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील गांधी भवनमध्ये बहुजन नेशनल पार्टी (आंबेडकर)च्यावतीने बहुजन महानायक कांशीराम यांच्या 92व्या जयंतीनिमित्त प्रथम बहुजन राष्ट्रीय विचार गोष्ठीचे आयोजन करण्यात आले. 'बहुजन आंदोलनाच्या समस्या व आव्हाने : कारण-निवारण व मार्ग' या विषयावर आयोजित या कार्यक्रमात देशभरातील विविध मान्यवरांनी सहभाग घेतला.

या विचार संगोष्ठीत नागपूरचे मा. एम. टी. बोरकर यांनी बहुजन समाजातील अंतर्गत समस्यांकडे लक्ष वेधताना, समाजातील विघातक प्रवृत्ती ओळखून त्यांना समाजापासून दूर करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. अय्यूब (राष्ट्रीय अध्यक्ष, पीस पार्टी), एम. टी. बोरकर (महाराष्ट्र), शाकिर मंसूरी (राष्ट्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज), मुहर सिंह अंबाडी (माजी आमदार, उत्तर प्रदेश), अँड. जे. एस. कश्यप (वरिष्ठ वकील, इलाहाबाद उच्च न्यायालय), खादिम अब्बास (इटावा), अनागरिक मिथिलेश कुमार व्यक्त केला. मुख्य अतिथी म्हणून बोलताना डॉ. अय्यूब यांनी पसमांदा मुस्लिम समाजाच्या समस्या आणि त्यावरील उपायांवर भाष्य केले. त्यांनी सर्व वंचित समाजांमध्ये ऐक्य, बंधुता आणि प्रामाणिक सहकार्याची भावना निर्माण होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. दरम्यान, बहुजन राष्ट्रकवी नेत्रपाल बृजवासी यांनी आपल्या गीतांद्वारे बहुजन समाजाला एकत्र येण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि बहुजन नेशनल पार्टी (आंबेडकर)चे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी खासदार प्रमोद कुरील यांनी बहुजन समाजाने सामाजिक, राजकीय, आर्थिक व बौद्धिक क्षेत्रात स्वतःची संस्थात्मक उभारणी करण्याची गरज अधोरेखित केली. 'कोणताही समाज स्वतःची संस्थात्मक ताकद उभी केल्याशिवाय सत्ताधारी वर्ग बनू शकत नाही,' असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. एस. अकमल यांनी केले. तसेच भविष्यात देशातील विविध राज्यांमध्ये अशाच प्रकारच्या विचार संगोष्ठी आयोजित करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

# अमेरिकेची जगात नाचक्की होत नाही आणि शरण येत नाही, तोपर्यंत युद्ध लढणार : इराण




**नवी दिल्ली :** अमेरिकेला संबोधित करताना अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला बेचिराख करण्याची भाषा केली. ट्रम्प यांच्या या धमकीनंतर इराणनेहीयुद्धातून माघार घेणार नसल्याचे सांगत दंड थोपटले आहे. अमेरिकेची जगात नाचक्की होत नाही आणि शरण येत नाही, तोपर्यंत युद्ध सुरूच राहणार, असा इशारा इराणने दिला आहे. इराणच्या लष्कराने म्हणजे आयआरजीसीने गुरुवारी (2 एप्रिल) अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानाला कडाडून प्रत्युत्तर दिले आहे. जोपर्यंत वॉशिंग्टनला (अमेरिका) कायमची नामुष्की, पश्चाताप आणि शरणागती पत्करावी लागत नाही, तोपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील, असे म्हटले.

# परदेशात दररोज 20 हून अधिक भारतीय कामगारांचा मृत्यू




**नवी दिल्ली :** सरकारने राज्यसभेत परदेशात काम करणाऱ्या भारतीय कामगारांच्या दयनीय अवस्थेबद्दल चिंताजनक आकडेवारी सादर केली. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांत परदेशात दररोज सरासरी 20 हून अधिक भारतीयांचा मृत्यू झाला आहे. यापैकी सर्वाधिक मृत्यू आखाती देशांमध्ये झाले आहेत. परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी 29 जानेवारी रोजी राज्यसभेला दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 2021 ते 2025 या काळात परदेशात एकूण 37,740 भारतीय कामगारांचा मृत्यू झाला. मात्र, सरकारने या मृत्यूंच्या कारणांचा सविस्तर तपशील दिला नाही. आकडेवारीनुसार, भारतीय कामगारांच्या मृत्यूची सर्वाधिक संख्या 2021 मध्ये 8,234 नोंदवली गेली. त्यानंतर 2022 मध्ये ही संख्या 6,614 पर्यंत कमी झाली. तथापि, त्यानंतर मृत्यूंची संख्या वाढतच राहिली. 2023 मध्ये 7,291, 2024 मध्ये 7,747 आणि 2025 मध्ये 7,854 कामगारांचा मृत्यू झाला.






## संपादकीय

# बहिष्कृत भारत : विचार व स्वाभिमानाची क्रांती

भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात काही उपक्रम असे आहेत, ज्यांनी केवळ एका काळावर परिणाम केला नाही तर पुढील अनेक पिढ्यांच्या विचारविश्वालाही दिशा दिली. 3 एप्रिल 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक त्यापैकी एक क्रांतिकारी पाऊल होते. हे केवळ वृत्तपत्र नव्हते, तर बहिष्कृत समाजाचा आवाज, स्वाभिमानाचा जाहीरनामा आणि सामाजिक न्यायासाठीचे प्रभावी शस्त्र होते. त्या काळात भारतात राजकीय सुधारणा सुरू झाल्या होत्या. इंग्रज सरकारकडून काही प्रमाणात सत्तेचे हस्तांतरण झाले होते, पण या प्रक्रियेत बहिष्कृत आणि अस्पृश्य समाज पूर्णपणे दुर्लक्षित राहिला. मुख्य प्रवाहातील माध्यमे उच्चवर्णीयांच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे वंचितांच्या समस्या कुठेच प्रतिबिंबित होत नव्हत्या. अशा परिस्थितीत 'बहिष्कृत भारतची स्थापना ही केवळ एक पत्रकारितेची घटना नव्हती, तर सामाजिक गरजेची तीव्र प्रतिक्रिया होती. पहिल्याच अंकात डॉ. बाबासाहेबांनी स्पष्टपणे मांडले की, प्रतिनिधित्वाशिवाय कोणतीही उन्नती शक्य नाही. त्यांनी बहिष्कृत समाजाच्या स्थितीचे अत्यंत वास्तववादी आणि कठोर विश्लेषण केले. त्यांची भाषा तीव्र होती, पण ती सत्यावर आधारलेली होती. कारण त्या काळात बहुसंख्य लोकांना आपले दुःख मांडण्याचे व्यासपीठच नव्हते. डॉ. बाबासाहेबांसाठी पत्रकारिता ही व्यवसाय नव्हती; ती सामाजिक परिवर्तनाची साधना होती. 'बहिष्कृत भारतच्या माध्यमातून त्यांनी तीन मुख्य उद्दिष्टे साध्य केली – बहिष्कृत समाजाला आवाज देणे, अन्यायाचे दस्तऐवजीकरण करणे आणि चळवळीला वैचारिक दिशा देणे. त्यांच्या लेखनात तर्क, अभ्यास आणि संघर्षाची जाणीव स्पष्ट दिसते. 'बहिष्कृत भारतचा प्रवास जरी 1927 ते 1929 या अल्पकालावधीत मर्यादित असला, तरी त्याचा प्रभाव अत्यंत व्यापक होता. एकूण 34 अंक आणि सुमारे 145 लेखांमधून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांचे सखोल विश्लेषण करण्यात आले. या प्रत्येक लेखातून एक विचारप्रवाह निर्माण झाला, ज्याने पुढील आंदोलनांना दिशा दिली. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा भारतीय इतिहासातील समतेसाठीचा पहिला मोठा लढा मानला जातो. 'बहिष्कृत भारतने या आंदोलनाचे वैचारिक नेतृत्व केले. पाण्याचा अधिकार हा मानवाधिकार आहे, सार्वजनिक संसाधनांवर सर्वांचा समान हक्क आहे आणि आत्मसन्मानाशिवाय जीवन अपूर्ण आहे. हे तत्त्व या आंदोलनातून अधोरेखित झाले. या विचारांचा प्रसार 'बहिष्कृत भारतच्या माध्यमातून व्यापक स्तरावर झाला. त्या काळात पत्रकारिता चालवणे आर्थिकदृष्ट्या कठीण होते. तरीही डॉ. बाबासाहेबांनी लोकसहभागातून 'प्रेस फंड' उभारला. देणग्यांची पारदर्शक नोंद प्रसिद्ध केली जात होती. यामुळे समाजात विश्वास निर्माण झाला आणि लोक चळवळीचे सक्रिय भागीदार बनले. ही लोकशाही पत्रकारितेची आदर्श पद्धत होती. 'बहिष्कृत भारत' हा डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारितेतील एक महत्त्वाचा टप्पा होता. पुढे त्यांनी 'मूकनायक', 'जनता', 'समता' आणि 'प्रबुद्ध भारत' यांसारखी अनेक माध्यमे सुरू केली. या सर्व माध्यमांमधून त्यांनी विचारक्रांती घडवली आणि वंचित समाजाला जागरूक केले. आज भारत स्वतंत्र आहे, संविधान आहे, आरक्षणाची व्यवस्था आहे. तरीही सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. शिक्षणातील असमानता, आर्थिक दरी, प्रतिनिधित्वाचा अभाव आणि माध्यमांतील पक्षपातीपणा हे प्रश्न आजही कायम आहेत. त्यामुळे 'बहिष्कृत भारतचे महत्त्व कमी झाले नसून अधिकच वाढले आहे. आज माध्यमांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि टीव्ही चॅनेल्स यामुळे माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. मात्र, या वेगात सत्य हरवण्याची भीती व्यक्त केली जाते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता अधिकच महत्त्वाची ठरते. त्यांच्या पत्रकारितेची तीन मूलभूत तत्त्वे होती. तथ्य, तर्क आणि समाजहित. ही तत्त्वे आजही तितकीच लागू आहेत. प्रतिनिधित्वाचा प्रश्न आजही अनेक क्षेत्रांत जाणवतो. प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण संस्था, मीडिया आणि उद्योग क्षेत्रात वंचित घटकांचा सहभाग अपेक्षेइतका नाही. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला इशारा आजही तितकाच सुसंगत आहे की, संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व नसेल तर समतेची प्रक्रिया अपूर्ण राहते. आजच्या पिढीसाठी 'बहिष्कृत भारतचा संदेश स्पष्ट आहे. शिक्षण हे मुक्तीचे साधन आहे, संघटन ही शक्ती आहे आणि विचाराशिवाय परिवर्तन शक्य नाही. माध्यमे ही केवळ माहिती देण्याचे साधन नसून सामाजिक जबाबदारीही आहेत. स्वाभिमानाशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण आहे, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. जर आज डॉ. बाबासाहेब 'बहिष्कृत भारत' सुरू करत असते, तर ते कदाचित डिजिटल स्वरूपात असते. पण त्याचे मूलभूत उद्दिष्ट बदलले नसते. सत्य मांडणे, वंचितांचा आवाज बनणे आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे. आज प्रश्न असा नाही की 'बहिष्कृत भारत' अस्तित्वात आहे का; प्रश्न असा आहे की त्याची गरज संपली आहे का? जोपर्यंत समाजात अन्याय, विषमता आणि तिरस्कार आहे, तोपर्यंत 'बहिष्कृत भारतची विचारधारा जिवंत राहणार आहे. 'बहिष्कृत भारत' हे केवळ एक वृत्तपत्र नव्हते; ते एक चळवळ होते. डॉ. बाबासाहेबांनी लेखणीला शस्त्र बनवून समाजाला आत्मविश्वास दिला. आज त्या वारशाचा अर्थ असा आहे की आपण सत्यासाठी उभे राहावे, विवेक जपावा आणि समतेच्या मार्गावर चालावे. 3 एप्रिल 1927 रोजी सुरू झालेली ही विचारयात्रा आजही सुरू आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण त्या प्रवासाचे सहप्रवासी आहोत का? ■ ■

# युद्धाच्या मानवी वेदनेत जग बुडाले..!

राजकारणी हिंसक बनले. मानवता विसरले. अहंकारी बनले. सुरूवात अमेरिका-इस्त्राईलने केली. इराणने प्रत्यूत्तर दिले. तीन देशांच्या संघर्षाने पृथ्वीतळाला घेरले. यात माणसाची निष्ठूरता दिसली. रानटीपणा उजेडात आला. क्रुरतेने कळस गाठला. संस्कृती, दया, करूणा, मैत्री, प्रेमभावाचा विसर पडला. माणूस क्रूरकर्मा बनला. माणसाचे एक स्वरूप असेही आहे. निष्ठूर, निर्घृण, खूनी, अहंकारी. या तीन देशात धमासान आहे. परस्परांवर हल्ले आहेत. त्यांनी जगाला वेठीस धरले. ते देश आता एकत्र येत आहेत. युद्ध थांबवा असे सांगत आहेत. आपल्या भूमीचा युद्धासाठी वापरास मज्जाव करीत आहेत. ही चांगली सुरूवात आहे. कदाचित जग आपल्या मुठीत आहे. या अमेरिकन मानसिकतेला धडा असेल. हे लवकर घडो. ही जगाची अपेक्षा आहे.

युद्ध विरोधात सुसंस्कृत अमेरिकन पुढे आले. रस्त्यांवर उतरले. पन्नास राज्यात नव्वद लाखांवर लोकांनी प्रदर्शन केले. अनेक देशातून युद्धाला विरोध आहे. युद्ध थांबवा अशी आर्त हाक आहे. भारत संस्कृतीचे गोडवे गातो. काही स्वतःला सुसंस्कृत म्हणवून घेतात. ती माणूस शाखेत बंदिस्त आहेत. उर्वरितांना युद्ध नको आहे. संघटनांची, देशांची व माणसांची मानसिकता ओळखण्याचे क्षण कितीतरी वर्षातून येतात. तेव्हा लेखाजोखा होतो. लाखों तरूण नोकऱ्या सोडून मायदेशी परतले. तिकडे युद्धात हजारों निरअपराधी मारले गेले. त्यात गरोदर माता, निरागस बालके, विद्यार्थी, नागरिक आहेत. युद्धाची झळ जगाला बसली. सामान्य माणसे भरडली गेली. जेवणाचे फाके पडू लागली. कामधंदे सोडून लोक रांगेत लागले. गॅसच्या रांगा, एलपीजीच्या रांगा, पेट्रोलच्या रांगा, असंख्य लोकांचे रोजगार बुडाले, धंदे चौपट झाले. यास दोशी कोण? दोषींना शिक्षा हवी. ती देणार कोण? असे अनेक प्रश्न आहेत. जग बेजार आहे. दुःखी आहे. अखेर तेहतिसाव्या दिवशी जग शांतता शोधत आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी युद्ध सुरू झाले. यात इराण-इस्त्राईलच्या शहरांतून धुराचे लोट निघत आहेत. अमेरिकन सैनिकांच्या डोळ्यात भीती आहे. या ज्वाला तीन देशांपुरत्या मर्यादित नाहीत. त्या जगभर पसरल्या. प्राणहानी आहे. आर्थिक नुकसान आहे. अप्रत्यक्षरीत्या इंधनाच्या किंमती वाढल्या. मानवी कष्ट वाढले. उपचार परस्परावलंबन आणि शांततेच्या मार्गाचा आहे. कारण युद्धात कोणी विजेता नसतो. सर्वत्र दुः ख असते. युद्ध सुरू झाल्यापासून एक महिन्याहून अधिक काळ लोटला. अमेरिका आणि इस्त्राईलच्या संयुक्त कारवाईने इराणच्या क्षेपणास्त्र सुविधा, हवाई तळ आणि औद्योगिक केंद्रांना लक्ष्य केले. इराणने प्रत्युत्तरादाखल इस्त्राईलवर क्षेपणास्त्रे सोडली, खाडीतील अमेरिकी तळांवर हल्ले केले आणि हर्मुझ सामुद्रधुनी नियंत्रित केली. या 33 दिवसांत प्रत्यक्ष प्राणहानी किती? संपत्ती नुकसान किती? खरे आकडे बाहेर येत नाहीत. इंधन अभावाने किती देशांना झळ पोहोचली? कोट्यवधी कोटींचे नुकसान कसे झाले? या प्रश्नांची उत्तरे शोधताना हृदय कळवळते, कारण युद्ध केवळ सैनिकांचे नसते. ते मातांचे, मुलांचे, सर्व जीवांचे असते. बौद्ध दृष्टीने हे सर्व जीव एकमेकांशी जोडलेले आहेत. एका ठिकाणची वेदना दुसऱ्या ठिकाणी पोहोचते. प्राणहानी आणि संपत्तीचा विनाश आहे. इराण हा युद्धाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. मानवी हक्क संघटना आदींचे अहवाल आले. टेऱ्हान, इस्फहान, याझद येथील सुविधा उद्ध्वस्त झाल्या. शाळा, रुग्णालये आणि घरांवरही परिणाम झाला. एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात 170 बालके मरण पावली. इराणमध्ये लाखो लोक विस्थापित झाले. औद्योगिक आणि तेल सुविधांचे अब्जावधीचे नुकसान झाले. हे फक्त आकडे नाहीत. हे प्रत्येक मृत्यूमागे कुटुंबाची वेदना आहे. इस्त्राईलमध्येही सैनिक, नागरिक मारले गेले. तेल अवीव आणि यरुशलेम येथे घरांवर आणि सुविधांवर परिणाम झाला. अमेरिकेचेही काही सैनिक मारले गेले. मध्य पूर्वेतील 17 तळांचे 800 मिलियन डॉलर्सचे नुकसान आहे. लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह-इस्त्रायल संघर्षातही लोक मारले गेले. खाडीतील देश बहारिन, जॉर्डन, कुवैत, कतार, सौदी अरेबिया, युनायटेड अरब अमिरात प्रभावित झाले. जॉर्डन, अझरबैजानसह सुमारे 10 देशांमध्ये प्रत्यक्ष प्राणहानी आणि नुकसान आहे. इराण, इस्त्राईल, अमेरिका, लेबनॉन आणि खाडीतील देशांत संपत्तीचे नुकसान अब्जावधी डॉलर्सचे आहे. यामागे प्रत्येक जीवाची कथा आहे. इराणी आईचा शोक, इस्त्राईली मुलांचा भय, अमेरिकी सैनिकांच्या कुटुंबाची प्रार्थना. बौद्ध करुणेच्या दृष्टीने हे सर्व जीव समान आहेत. त्यांच्या दुःखात भेदभाव नसावा. अप्रत्यक्ष पेट्रोल, इंधन, गॅसची 95 देशांना झळ बसत आहे. ब्रिटनने युद्धग्रस्त 35 देशांची बैठक बोलावली. बैठकीत युद्ध, सुरक्षा, भाववाढ, इंधन प्रश्नावर चर्चा होणार. युद्धाची सर्वात व्यापक बाजू अप्रत्यक्ष आहे. 4 मार्चपासून इराणने हर्मुझ सामुद्रधुनी नियंत्रित केली. जगाच्या 20 टक्के तेल आणि मोठ्या प्रमाणात एलएनजी यातून वाहतूक होते. ब्रेंट क्रुड तेलाची किंमत 55 टक्कांनी वाढली. जगभर पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किंमती वाढल्या. चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया, पाकिस्तान, बांगलादेश, फिलिपीन्स, सर्वात प्रभावित आहेत. इंधनाच्या रांगा, महागाई आणि रेशनिंग सुरू झाले. युरोप, नायजेरिया, झिम्बाब्वे, व्हिएतनाम सर्वत्र परिणाम आहे. उड्डाण कंपन्या प्रभावित आहेत. शिपिंग खर्च वाढला. खतांच्या किंमती 30 टक्के वाढल्या. जगाच्या अर्थव्यवस्थेवर 0.3 ते 1 टक्के जीडीपीचा फटका बसला. ग्लोबल ग्रोथ घटली. भारतासाठी ही झळ तीव्र आहे. जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार आहे. दररोज अतिरिक्त खर्च शेकडो कोटीत आहे. शेती, वाहतूक आणि उद्योग प्रभावित झाले. स्टॉक मार्केट प्रभावित आहे. मुद्रास्फीती वाढली आहे. हर्मुझ बंदीने केवळ इंधन नाही, तर जगाच्या आर्थिक स्थिरतेच्या आशा प्रभावित झाल्या. युद्धाची ज्वाला दूर असली तरी तिची झळ प्रत्येक घरात पोहोचते. मानवी किंमत मोजावी लागते. त्यांची निष्ठूर राजकारण्यांना चिंता नाही. ग्लोबल जीडीपीवर 0.3टक्के फटका म्हणजे लाखो कोटी रुपयांचे नुकसान. विमा, शिपिंग, उड्डाण आणि शेती प्रभावित आहे. ही संख्या फक्त आकडे नाहीत. ती करोडो लोकांच्या रोजगाराची, भविष्याची आणि स्वप्नांची होरपळ आहे. प्रत्येकजण भीतीत आहे. युद्धास कोणाला दोष देण्यापेक्षा सर्व बाजूंच्या वेदनेचा स्वीकार करणे आवश्यक आहे. 33 दिवसांत हजारो जीव गेले. लाखो जखमी झाले. कोट्यवधी विस्थापित झाले. शाळेंवर हल्ला, सैनिकांचे शव, कुटुंबांचे आक्रोश हे चित्र हृदय पिळवटते. युद्ध कधीही विजेता देत नाही. फक्त विध्वंस, बळी, महागाई, भूक आणि बेरोजगारी देते. हिच युद्धाची सावली आहे. या अंधारातही करुणेची किरणे दिसतात. जगभर शांतता आंदोलने, राजनैतिक प्रयत्न. ही संघर्ष थांबवण्याची वेळ आहे. द्वेषाने द्वेष शमत नाही. करुणा आणि संवादाने शांती येते. तेहतिसाव्या दिवशी जग दुःखात आहे. युद्धाने 10 देशांना प्रत्यक्ष वेदनेने पोळले. 95 देशांना इंधनाच्या प्रभावाने प्रभावित केले. जगाला अब्जावधी कोटींचे नुकसान दिले. यापेक्षा मोठी हानी मानवी आहे. हे युद्ध सर्व बाजूंच्या दृष्टीने पाहणे आणि शांततेचा संदेश देणे आवश्यक आहे. ही ज्वाला विझवण्यासाठी शांतता, संवाद आणि मानवतेची गरज आहे. अन्यथा ही वेदना संपूर्ण जगाला भस्मसात करेल. शांतता हवी, युद्ध नको. या संघर्षात फक्त देश हरलेले नाहीत. मानवता हरलेली आहे. आता वेळ आहे करुणेची, संवादाची, एकतेची आणि युद्ध थांबविण्याची एवढेच.. ■ ■





भूपेंद्र गणवीर
9850031019

# हिंदुत्ववादी संघटना कुठल्या बिळात लपल्या आहेत?

**नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्रातील समाजजीवन, राजकारण आणि अंधश्रद्धेचे भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आणले आहे. एका तथाकथित 'बाबा'च्या जाळ्यात शेकडो महिला, अधिकारी, नेते आणि सामान्य नागरिक अडकले होते, हे समजताच समाज हादरला. मात्र या प्रकरणाचा भंडाफोड शासन यंत्रणेने केला नसून, अंतर्गत वाद आणि व्हायरल झालेल्या व्हिडिओंमुळे झाला, ही बाब अधिक चिंताजनक आहे.**

या प्रकरणात सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, विज्ञाननिष्ठ समाज घडविण्याची शपथ घेतलेले मंत्री, आमदार, अधिकारी हेच जर अशा भोंदू बाबांच्या मागे उभे राहत असतील, तर सामान्य नागरिकांकडून काय अपेक्षा ठेवायची? खरे तर 'ढोंगी' आणि 'भोंदू' ही बिरुदे त्या बाबाला लावण्यापेक्षा, त्याच्या मागे उभे राहणाऱ्या सुशिक्षित समाजातील लोकांना लावणे अधिक योग्य ठरेल.

अशोक खरात प्रकरणामुळे काही राजकीय नेत्यांना राजीनामे द्यावे लागले, परंतु अजूनही अनेकजण मौन बाळगून आहेत. ज्या ज्या लोकांनी या बाबाच्या आश्रमाला भेट दिली, त्यांची नैतिक जबाबदारी ठरवली गेली पाहिजे. परंतु सत्तेच्या समीकरणांमुळे आणि राजकीय संरक्षणामुळे ही जबाबदारी टाळली जात आहे, हे वास्तव आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, नेहमी 'हिंदू धर्म धोक्यात आहे' असे सांगणाऱ्या हिंदुत्ववादी संघटना आणि नेते या प्रकरणात पूर्णपणे शांत आहेत. ज्या महिलांवर अत्याचार झाले, त्या देखील हिंदूच होत्या, हे ते विसरले आहेत का? की अत्याचार करणारा आणि पीडित दोघेही एका धर्माचे असल्याने आंदोलन करणे कठीण झाले आहे? हा प्रश्न समाजाला पडत आहे. देशात याआधीही अनेक बाबांच्या घोटाळ्यांनी समाज हादरला आहे. आसाराम, राम रहिम, रामपाल, नित्यानंद, नारायण साई यांसारख्या अनेकांनी धर्माच्या नावाखाली लोकांची फसवणूक केली, महिलांचे शोषण केले, गुन्हे केले. तरीही त्यांचे लाखो अनुयायी आजही आहेत. यावरून स्पष्ट होते की समस्या केवळ एका व्यक्तीची नाही, तर संपूर्ण मानसिकतेची आहे. धर्माच्या नावाखाली लोकांचा विश्वास संपादन करणे आणि त्याचा गैरफायदा घेणे, ही एक पद्धतच बनली आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील सीमारेषा समाजाला अजूनही समजलेली नाही. लोकांनी आपल्या विचारशक्तीचा वापर करणे थांबवले आहे आणि कोणत्याही तथाकथित 'गुरू'च्या मागे आंधळेपणाने धावण्याची प्रवृत्ती वाढली आहे. आज विज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. मानव चंद्रावर आणि मंगळावर पोहोचला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगातील कोणतीही माहिती काही क्षणात मिळू शकते. तरीही समाजातील मोठा वर्ग अजूनही बाबा-बुवांवर विश्वास ठेवतो, हे अत्यंत दुर्दैवी आहे. संत परंपरेचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात गाडगेबाबांसारख्या संतांनी अंधश्रद्धेविरोधात आयुष्यभर लढा दिला. त्यांनी स्वच्छता, विवेक आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला. परंतु आज त्याच समाजाने त्यांच्या शिकवणीला विसरून, भोंदू बाबांच्या मागे जाण्याचा मार्ग स्वीकारला आहे. या सगळ्या प्रकारात माध्यमांची भूमिकाही प्रश्नचिन्हाखाली येते. खरात प्रकरणातील महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करणे, त्यावर चर्चा करणे, ही अत्यंत निंदनीय बाब आहे. या महिलांचा सन्मान आणि गोपनीयता जपण्याऐवजी, त्यांच्या दुःखाचा बाजार मांडला जात आहे. समाज म्हणून आपण कुठे चाललो आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. प्रत्येक वेळी सरकारकडून अपेक्षा ठेवण्यापेक्षा, नागरिकांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे. अंधश्रद्धेविरोधात आवाज उठवणे, विवेकाने विचार करणे आणि इतरांनाही जागरूक करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण सामान्य माणूस आहोत, आपण काय करू शकतो, ही मानसिकता बदलावी लागेल. समाजात बदल घडवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची असते. आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात, गावात अंधश्रद्धेविरोधात जागृती करणे हीच खरी सुरुवात ठरू शकते. महत्त्वाची बाब म्हणजे, या लढ्यात कोणत्याही धर्म कंवा जातीला सरसकट दोष देणे चुकीचे आहे. दोष व्यक्तींचा आहे, प्रवृत्तींचा आहे. आपल्या समाजातही अशा प्रवृत्ती आहेत, हे मान्य करून त्यांच्याविरोधात उभे राहणे आवश्यक आहे. अशा भोंदू बाबांना मोठे करण्यामध्ये समाजाचाही वाटा आहे. लोकांनीच त्यांच्यावर विश्वास ठेवला, त्यांना पैसा दिला, त्यांची पूजा केली. त्यामुळेच त्यांना इतकी ताकद मिळाली. आता त्याच समाजाने त्यांच्या विरोधात उभे राहणे गरजेचे आहे. अंधश्रद्धा ही समाजासाठी एक मोठा शाप आहे. ती केवळ व्यक्तीचे नुकसान करत नाही, तर संपूर्ण समाजाला अधोगतीकडे घेऊन जाते. त्यामुळे अंधश्रद्धेविरोधात लढा देणे ही काळाची गरज आहे. जर आपण खरोखरच समाज सुधारायचा असेल, तर विवेक, विज्ञान आणि मानवतेचा मार्ग स्वीकारावा लागेल. अन्यथा अशा 'बाबा' आणि 'बुवां'ची संख्या वाढतच राहील आणि समाजाची फसवणूक होत राहील. ■ ■



हरदास भिसे
मो. 9923742372



# महिला सक्षमीकरण आणि समाज व्यवस्था?



मानवसमूहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांना हतोत्साहित करणारे वर्तन करून, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारे (जेंडर इक्वॅलिटी) समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोनातून केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमीकरण, असे थोडक्यात म्हणता येईल. महिला सक्षमीकरण हा विषय काळाची गरज असलेला विषय आहे; कारण तो समाजाच्या प्रगतीचा आणि न्याय व्यवस्थेचा पाया आहे. आज 'महिला सक्षमीकरण' हा शब्द केवळ धोरणात्मक भाषेत नाही तर सामाजिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आला आहे. स्त्रीला समान अधिकार, संधी, शिक्षण आणि निर्णयक्षमता मिळाल्याशिवाय समाजाचे खरे परिवर्तन शक्य नाही. म्हणूनच महिला सक्षमीकरण ही प्रत्येकाची पुरुषांची, स्त्रियांची आणि संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. इतिहास पाहिला तर स्त्रीला अनेक शतकांपासून दुय्यम स्थान देण्यात आले. घराच्या चौकटीतच तिची भूमिका मर्यादित ठेवली गेली. परंतु शिक्षण, सामाजिक चळवळी आणि संविधानिक अधिकारांच्या माध्यमातून स्त्रीने आपल्या हक्कांची जाणीव करून घेतली. या परिवर्तनाच्या प्रवासात अनेक समाजसुधारकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उदाहरणार्थ, Savitribai Phule यांनी स्त्री शिक्षणाचा दीप प्रज्वलित केले, तर Dr. B. R. Ambedkar यांनी स्त्रियांच्या समान हक्कांसाठी कायदेशीर आणि सामाजिक लढा दिला. महिला सक्षमीकरणाचा अर्थ केवळ आर्थिक स्वावलंबन नाही; तर स्वतंत्र विचार, निर्णयक्षमता, आत्मविश्वास आणि सामाजिक सन्मान हेही त्याचे महत्त्वाचे घटक आहेत. शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, राजकीय सहभाग आणि आर्थिक संधी या क्षेत्रांत स्त्रियांना समान स्थान मिळणे आवश्यक आहे. जेव्हा स्त्री सक्षम होते तेव्हा ती केवळ स्वतःचे आयुष्य बदलत नाही, तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाला पुढे नेते. आजच्या काळात स्त्रिया विज्ञान, शिक्षण, राजकारण, साहित्य, उद्योग, क्रीडा अशा सर्व क्षेत्रांत मोठी कामगिरी करत आहेत. तरीही अनेक ठिकाणी भेदभाव, हिंसा, वेतनातील असमानता आणि सामाजिक बंधने अजूनही अस्तित्वात आहेत. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही अजूनही अपूर्ण लढाई आहे. खरे तर महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीला 'सामर्थ्य देणे' नव्हे, तर तिच्या असलेल्या सामर्थ्याला मान्यता देणे आणि संधी देणे होय. घरात आणि समाजात समानतेची संस्कृती निर्माण करणे. स्त्रियांच्या मतांना आणि निर्णयांना सन्मान देणे. अन्याय, हिंसा आणि भेदभावाविरुद्ध ठाम भूमिका घेणे. जेव्हा समाज स्त्रीला समानतेने स्वीकारेल, तेव्हा खरे लोकशाही समाज निर्माण होईल. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही, तर समाजाच्या प्रगतीची मुख्य शक्ती आहे. आई, बहीण, पत्नी, मुलगी अशा अनेक भूमिकांमध्ये ती समाजाचे संस्कार घडवत असते. तरीही इतिहासात अनेक शतकांपर्यंत स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रीच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली गेली. शिक्षणापासून दूर ठेवले गेले, निर्णयप्रक्रियेत स्थान दिले गेले नाही, आणि तिच्या क्षमतेकडे दुर्लक्ष केले गेले. परंतु समाज परिवर्तनाच्या चळवळींनी या परिस्थितीत बदल घडवून आणण्यास सुरुवात केली. स्त्री शिक्षणाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या Savitribai Phule यांनी समाजातील अंधार दूर करण्याचे महान कार्य केले. सामाजिक न्यायाचे महान योद्धा Dr. B.R.Ambedkar यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना समानतेचे अधिकार दिले. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'मी समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून करतो.' या एका वाक्यात महिला सक्षमीकरणाचा संपूर्ण अर्थ सामावलेला आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे तिच्या आयुष्याविषयी निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे. तिला शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि सन्मान मिळणे. तिला समान संधी मिळणे. आजच्या काळात स्त्रिया विज्ञान, प्रशासन, उद्योग, साहित्य, क्रीडा अशा सर्व क्षेत्रांत मोठी कामगिरी करत आहेत. अंतराळ क्षेत्रात Kalpana Chawla यांनी इतिहास घडवला. क्रीडा क्षेत्रात Mary Kom यांनी जगभर भारताचे नाव उज्वल केले. प्रशासन क्षेत्रात Kiran Bedi यांनी नवा आदर्श निर्माण केला. ही उदाहरणे दाखवतात की संधी मिळाल्यास स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. तरीही आपल्याला स्वतःला एक प्रश्न विचारावा लागतो, की खरोखरच आपला समाज स्त्रीला समानतेने स्वीकारतो का? आजही अनेक ठिकाणी स्त्रियांना भेदभाव, हिंसा अत्याचार, अगदी लहान बालिकांवर आणि महिलांवर होणारे बलात्कार, ॲसिड हल्ला इत्यादी अन्यायाला सामोरे जावे लागते. आजही मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद केला जातो. स्त्रियांच्या स्वप्नांवर मर्यादा घालण्याचा प्रयत्न केला जातो. ही परिस्थिती बदलणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. महिला सक्षमीकरणासाठी तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पहिले ...शिक्षण, शिक्षणामुळे स्त्री आत्मविश्वासी बनते. अनेकदा स्त्री ही शिक्षित असुनही तिला घरातील कोणत्याही निर्णयावर बोलण्याची अनुमती घरातील पुरूष वर्ग देत नाही. तिला काय समजते अशी उपेक्षा केली जाते. अवहेलना केली जाते.'स्त्रीला ज्ञानाचे दरवाजे खुले झाले तर समाजाचा अंधार दूर होतो.' असे माता सावित्रीबाई फुले म्हणाल्या. स्त्रीला तिच्या स्वप्नांची पंखे दिली तर ती आकाशही जिंकू शकते.' दुसरे....आर्थिक स्वावलंबन असणे तेवढेच महत्त्वाचे आहे. स्वतः कमावती असूनही काही घरांत तीची कमाई खर्च करण्यासाठी पतीच्या परवानगीची गरज असते. किंवा तिचे पैसे कुठे खर्च करायचे हे तो ठरवतो. तिचा पैसा हा त्याचा समजला जातो. अशा वेळी तिचे आर्थिक स्वातंत्र्य दडपले जाते. तिचे मानसिक खच्चीकरण होते. आपल्या समाजातील पुरुषांची अशा प्रकारची मानसिकता दूर होणे आवश्यक आहे. तरच स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकते आणि तरच तिची निर्णयक्षमता दृढ होईल, आत्मविश्वास वाढेल. तिसरे... सामाजिक सन्मान देणे. स्त्री ही शिक्षित असुनही, कमावती असूनही, घरात तिचा वारंवार होणारा अपमान तिला मानसिक दृष्ट्या कमकुवत करते. कामाच्या ठिकाणी तसेच सामाजिक ठिकाणी सन्मान होतो. पण घरात मात्र सदोदित अपमान, अवहेलना सहन करावी लागते. ही मानहानी तिला अनेकदा सहन होत नाही. काही जणी आपला संसार मोडला जाऊ नये यासाठी सर्व अन्याय सहन करतात. काही जणी आत्मसन्मानाची लढाई लढतात. त्यातून पती पत्नीची ताटातूट होते. जेव्हा ती पतीचे घर सोडून स्वतंत्र रहायला लागते तेव्हा तिला समाजात नानाविध प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यासाठी स्त्रीला केवळ शिक्षण घेऊन, कमावती होऊनही अपमानित व्हावे लागते. म्हणून स्त्रीला समाजात समान मान मिळणे आवश्यक आहे. जेव्हा या तीन गोष्टी एकत्र येतात तेव्हा खरे सक्षमीकरण घडते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मते 'स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांशिवाय स्त्रीचे खरे सक्षमीकरण शक्य नाही.' महिला सक्षमीकरण ही केवळ स्त्रियांची लढाई नाही. ती संपूर्ण समाजाची लढाई आहे. स्त्रीला समानतेने स्वीकारल्याशिवाय लोकशाही पूर्ण होऊ शकत नाही. जर आपल्याला प्रगत आणि न्याय समाज निर्माण करायचा असेल तर स्त्री-पुरुष समानतेची संस्कृती निर्माण करावी लागेल. पंडिता रमाबाई यांच्या मते 'स्त्री ही केवळ घराची मर्यादा नसून समाजाच्या विकासाची शक्ती आहे.' स्त्रीला समान संधी दिल्यास ती कोणत्याही क्षेत्रात पुरुषांपेक्षा कमी नाही हे सिद्ध करते. कारण 'स्त्रीचे स्वातंत्र्य म्हणजे खऱ्या अर्थाने मानवतेचे स्वातंत्र्य होय.' महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीला 'शक्ती देणे' नव्हे; कारण ती शक्ती तिच्यात आधीपासूनच असते. समाजाने केवळ तिच्या क्षमतेला संधी आणि मान्यता देणे आवश्यक आहे. स्त्री सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, समाज सक्षम होतो आणि राष्ट्रही प्रगत होते. म्हणूनच महिला सक्षमीकरण ही केवळ सामाजिक सुधारणा नाही; ती न्याय, समानता आणि लोकशाहीच्या भविष्याची हमी आहे. थोडक्यात, महिला सक्षमीकरण ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून ती एक निरंतर चालणारी सामाजिक चळवळ आहे, ज्यामध्ये आपली सर्वांची सक्रिय भागीदारी महत्त्वाची आहे. ■ ■

प्रा. संध्या वैद्य
मो. 9029229634

# कृत्रिम म्हणजे प्रगत व नैर्सगिक म्हणजे अप्रगत व रानटी का?



यासर्वकाही प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून असते. कोण श्रेष्ठ? कोण कनिष्ठ? हे आपली मानसिकता ठरवित असते, जी मानस विज्ञानाची सतत चालणाऱ्या मेंदुची प्रक्रिया असते व ती इतर पंचेद्रियांच्या मदतीने व अनुभवसिद्धिने कार्यरत असते. सर्वकाही हे प्रत्येकावर निर्भर करते. निर्सग व कृत्रिमता (विज्ञान/तंत्रज्ञान) याच्यातील विरोधविकासवादी संयोग व संघर्षातून या साऱ्या घटना अविरत चालत असतात. जे जे गैरनैर्सगिक ते ते ते सर्व विज्ञान व तंत्रज्ञान; जे मुळात नैर्सगिक वस्तुंचा वापर करूनच निर्माण केल्या जात असते. धान्य, पाणी, अग्नी व इतर वस्तु इत्यादी नैर्सगिक वस्तुंचा वापर मानव करून त्याचे शिजलेले भोजन तयार करीत असतो. ही रासायनिक व भौतिक प्रकारातील प्रक्रिया असते. तसेच तो जैविक विज्ञानाचा वापर करून तो व इतर प्राणी हे प्रजा निर्मिती समप्राणिक नर व मादीच्या संभोगातून (Sex) या नैर्सगिक माध्यमातून करीत असतो. तसेच मानव हा मानस विज्ञानाचा वापर करून ईश्वर, धर्म, कर्मकांड, पुजा, अर्चना इ. या मानसिक गंड घडविणाऱ्या शारीरिक, भौतिक व रासायनिक कृत्या करीत असतो. मानसिक धारणा जसे ईश्वर, धर्म, कर्मकांड, पुजा, अर्चना या मानस, भौतिक, रासायनिक व जैविक विज्ञानाच्या संयुक्त भेसळ व मिसळातून निर्माण होत असतात. म्हणून ईश्वर, धर्म व त्या त्या विविध धर्माच्या मान्यता या सर्व विज्ञानाचेच घटक असतात. म्हणून धर्म किंवा मानस विज्ञान व विज्ञान यात निव्वळ संघर्ष नसून त्यात विरोधविकासवादाचे मूलभूत घटक सहभागी असतात, जे मुळ (Thesis), मुळावर (on thesis) प्रक्रिया करणारे Anti-thesis व यांच्या संघर्ष व मिलनातून निर्माण होणारे Synthesis (नवीन निर्मीती) अशी प्रक्रिया ही संपूर्ण विश्वात सतत व प्रचंड गतीशीलतेने चालत राहते; जो निर्सगाचा, सृष्टीचा सिरस्ता आहे. प्रत्येक Synthesis हे लगेच किंवा सोयीच्या कालांतराने thesis ची जागा घेत असते, ज्याला मानव हा पिढ्या किंवा परंपरा म्हणून पेश करीत असतो. मानवाने ते पेश केले किंवा नाही केले तरी ते सतत चालत असते. जे Static असते त्याला dyanamic करण्याची प्रक्रिया म्हणजेच Dilectics; ज्यांचा आधार हा thesis, antithesis व synthesis या कृत्या असतात. निर्मिती आणि विनाश ही सतत चालणारी स्पर्धात्मक प्रक्रिया आहे, ज्याला आपण द्वंद/युद्ध (mechanism) समजतो. निर्सगात या प्रक्रिया सतत घडत असतात. जे जे नैर्सगिक असते त्याचेही प्रकार पडतात. सामान्य, असामान्य व विध्वंसक. जे जे कृत्रिम असते त्यातही असेघटक असतात. यातील द्वंदात्मक विरोध व संगती या कळल्या की मानवाने निर्माण केलेल्या विविध व असंख्य संकल्पना, धारणा व कल्पनांचा उलगडा करता येतो. नैसर्गिक आपत्ती व देशादेशंमधील युद्ध यात मुळात फरक नाही. नैर्सगिक आपत्ती ही नैर्सगिक असते तर युद्ध हे कृत्रीम असते. यातही काही नैर्सगिक व कृत्रीम यांच्या सरमिसळीतून निर्माण होत असते, जसे धरणाची निर्मिती व धरणाचे फुटणे. मानवता व अमानवता या धारणा मानवाच्या मानसिक धारणा आहेत; ज्या मानवाच्या अन्य मानसिक धारणा जसे ईश्वर, धर्म, निरेश्वर, अधर्म, आस्तिक, नास्तिक व वास्तविक इत्यादी यांच्या संकल्पनांतील संयोग व द्वंदातूनच निर्माण झालेल्या असतात व त्याच मानवांसह सर्व गैरमानवीय प्राणी व संसाधने यावर सत्ता गाजविण्याची व्यवस्था निर्माण करीत असतात; ज्याला आपण राजनीती, Politics संबोधत असतो. राजनीती ही अशा सर्वांचा वाट्टेल तसा वापर करीत सत्तास्थळे निर्माण करीत असते व त्यात मानव हा मानवांचाच वापर thesis, auntithesis म्हणून करीत असतो व निरंतर नवीन Synthesis म्हणजे सत्ताकेंद्र निर्माण करीत असते, ज्याला आपण साम्राज्य संबोधतो. नवनवीन साम्राज्यांची स्थिती निर्माण करणारी संकल्पना म्हणजे राजनितीतील कुटनिती व मुत्सद्दी कृती. साम्राज्य हे सतत बदलत असतात, हे वास्तविक इतिहासाचे अवलोकन केले तर लक्षात येते. सत्ताकेंद्रात बदल घडविणे म्हणजे राजनीती; जी मुळातच मानवाने मानवासह अन्य गैरमानवीय प्राणी व संसाधने यावर मिळविलेल्या हुकमतीला वाढविणे किंवा घटविणे, यावर निर्भर असते. युद्ध व शांती हे याचे अपरिहार्य घटक आहेत व यात सतत संघर्ष सुरूच असतो व या संघर्षालाच आपण मानव 'जीवन जगणे' अशी मानसिकता धारण करून वर उल्लेखित मानसिकतांचा वापर करीत असतो. जगणे म्हणजे नैर्सगिकता व कृत्रिमता यांची सरमिसळ व भेसळीचा वापर करणे होय. मानवी जीवनात कृत्रिमता जादा आहे तर गैरमानवीय जीवनात नैर्सगिकता जादा आहे. कृत्रिम असणे म्हणजे प्रगत व नैर्सगिक असणे म्हणजे अप्रगत व रानटी असे आहे का? याचे उत्तर काय बरे असावे ? ■ ■



विनोद उलीपवार
मो.9370138078

“ मानवी नात्यात जर सर्वात मोठा शत्रू कूणी असेल तर तो म्हणजे गैरसमज!... ”



# वन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा ! होण्या ओबीसी जनगणना !

ओबीसीची जातवार जनगणना करण्यात आली पाहिजे. यासाठी पुन्हा वन्ही पेटला आहे. ओबीसीची जातवार जनगणना करण्याचे आश्वासन देऊन प्रत्यक्ष जनगणना करण्याची वेळ आली तर ओबीसीचा रकानाच नाही. यामुळे संतप्त झालेला ओबीसी रस्त्यावर उतरून लढत आहे. दशवार्षिक जनगणना हा कार्यक्रम दर दहा वर्षांनी साधारणतः अमलात येत असतो. भारतातील सर्व लोकांची जनगणना होऊन त्याचा उपयोग देशातील विविध धोरणात्मक योजना आखण्यासाठी आणि रचनात्मक विकास कामासाठी करण्यात येतो. विशेषतः ज्या मागास घटकांसाठी विशेष पावले उचलण्याची गरज असते. त्यासाठी या जनगणनेची आकडेवारी अधिक उपयुक्त असते. त्यानुसार दर दहा वर्षानंतर ही जनगणना करण्यात येते. परंतु यावर्षी होणारी ही जनगणना नियमित जनगणनेपेक्षा सुमारे पाच - सहा वर्षे उशिरा होऊ घातलेली असून त्या जनगणनेमध्ये ओबीसी प्रवर्गाचा विचार करण्यात आलेला नसल्यामुळे ओबीसी अतिशय संतप्त झालेला आहे. होऊ घातलेल्या जनगणनेमध्ये ओबीसीचा कॉलम टाकण्यात यावा आणि ओबीसीची जातवार जनगणना करण्यात यावी. या दृष्टीने 'वन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ओबीसी जातवार जनगणनेतून ओबीसी समाजातील मागासपणांची कारणे समोर येतील आणि ओबीसी समाजाला भविष्यामध्ये न्याय देण्याच्या दृष्टीने आकडेवारी समोर येईल, ओबीसी समाज घटकांना न्याय मिळावा म्हणून मोठ्या प्रमाणामध्ये हालचाली सुरू झालेल्या आहेत. मध्यंतरी ओबीसी समाजाची जनगणना करून ओबीसींच्या आरक्षणाचा विचार केला जाईल असे आश्वासन अनेकदा देण्यात आले. परंतु त्या आश्वासनांचे काय झाले याचे उत्तर काही ओबीसींना मिळत नाही. साधारणतः दर दहा वर्षांनंतर होणारी जनगणना. 1931 नंतर ओबीसीची जातवार जनगणना करण्यात आली नाही. ओबीसी समाज हा मागास समाज असून जातीव्यवस्थेमध्ये त्याचेही शोषण झालेले आहे. त्यामुळे ती शोषण व्यवस्था समजून घेण्यासाठी आणि त्या शोषण व्यवस्थेचे परिणाम ओबीसी समाजावर काय व कसे झाले याची एकंदरीत आकडेवारी समोर येण्याच्या दृष्टीने ही जनगणना होणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होत आहे. ओबीसींना आरक्षण सुरू होण्याची संविधानिक तरतूद घटनेच्या 340 व्या कलमानुसार करण्यात आलेली होती. त्यानुसार ओबीसी आरक्षणासंबंधी पावले उचलण्यात आलीत. 1953 मध्ये जवाहरलाल नेहरूंनी पहिला मागासवर्ग आयोग त्यासाठी गठित केला होता. काका कालेलकर त्या आयोगाचे अध्यक्ष होते. हा भारतातील पहिला मागासवर्गीय आयोग होता, ज्याने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची ओळख पटवून त्यांच्या कल्याणासाठी शिफारसी केल्या. या आयोगाने 1955 मध्ये अहवाल सादर केला, ज्यात 2,399 मागास जातींची नोंद करण्यात आली होती. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची चौकशी करून त्यांच्या प्रगतीसाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या होत्या. काका कालेलकर आयोगाने केलेल्या शिफारसीत जातीला मागासलेपणाचे मुख्य कारण मानले. तांत्रिक आणि व्यावसायिक संस्थांमध्ये 70टक्के जागा राखीव ठेवणे. सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण. महिलांना मागास वर्ग मानणे. इ. प्रमुख शिफारशी होत. हा अहवाल सरकारने स्वीकारला नाही, ज्यामुळे ओबीसी आरक्षणासाठी मोठा काळ वाट पहावी लागली. हा आयोग सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले पहिले मोठे पाऊल मानले जाते.



ओबीसींसाठी आरक्षणाची आवश्यकता असूनही कालेलकर आयोगाचा गांभीर्याने विचार झालेला नाही. तो आयोग तसाच थंड बस्त्यात पडून राहिला. पण ओबीसीच्या मागासपणाची धग वाढतच राहिली. राजकीय पटलावर पसरु लागली. ओबीसी आरक्षणाचा वन्ही चेतत गेला. हिंदी भाषिक प्रदेशात ओबीसी समुदाय समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांचेकडे आकृष्ट होत गेले. लोहियांनी 1960 मध्ये 'पिछडे पावे सौ में साठ' हा नारा देत मागासवर्गीय समाजात चेतना निर्माण केली आणि राजकीय आखाड्यात मागासवर्गीयांचे महत्त्व वाढू लागले. मागासवर्गीयांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या भावनेने काँग्रेसला धक्के बसू लागले. चौधरी चरणसिंग ओबीसी नेते म्हणून पुढे आले. उत्तर प्रदेशात 1975 मध्ये हेमवतीनंदन बहुगुणा यांनी छेदीलाल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग गठीत केला. ओबीसींना 15 टक्के आरक्षण घोषित केले. नंतर 1979 मध्ये बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने देशभर दौरे करून सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांची - ओबीसीची ओळख पटवण्याचे काम केले. जातीय भेदभाव दूर करण्यासाठी, लोकांसाठी आरक्षणाच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी मागासलेपणा दूर करण्यासाठी अकरा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक निर्देशांकाचा वापर करून मागासपण निश्चित केले गेले. 1980 ला मंडल आयोगाने अहवाल सादर करुन ओबीसींसाठी सरकारी नोकरीत आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 27 टक्के आरक्षणाची शिफारस केली. याशिवाय ओबीसीच्या आमूलाग्र विकासासाठी अन्य महत्वपूर्ण शिफारशी केल्या. सन 1990 ला व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने मंडल आयोग नावाने विख्यात सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग आयोग लागू करण्याची घोषणा केली. शासकीय नोकरीत ओबीसींना 27 टक्के आरक्षण लागू केले. या घोषणेचा परिणाम असा झाला की उच्चजातीय आरक्षण विरोधकांनी तीव्र विरोध केला. भाजपने व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. राम मंदिराचा भावनिक मुद्दा उकरून काढला. मंडल आयोग लागू केल्यानंतर ओबीसीची लहर देशभर पसरू लागली. उत्तर भारतीय मूलभूत राजकीय वातावरण पुरेपूर बदलून गेले. याच काळात मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, नितीश कुमार, शरद यादव यांच्यासारखे नेते राष्ट्रीय पातळीवर प्रभावी ठरले. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेतून कांशीराम मुलायमसिंह एकत्र येऊन भाजपचा पराभव केला. 1992 ला बाबरी विध्वंसानंतर भाजप विजयाच्या विश्वासाने पुढे जात असताना 1993 च्या विधानसभा निवडणुकीत सपा-बसपाने भाजपला चीत केले. मागासवर्गीय राजकारणाचा जय झाला. अनेक प्रांतांमध्ये आणि राष्ट्रीय पातळीवर ओबीसी नेतृत्वाचा विकास आणि ओबीसी धार्जीने राजकारण आकारास यायला सुरुवात झाली. सामाजिक न्यायाच्या लढाईत ओबीसीच्या संघर्षाचा आणि उत्कर्षाचा हा देदीप्यमान कालखंड अविस्मरणीय ठरला. सन 2006 ला अर्जुन सिंग यांनी केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये ओबीसींना 27 टक्के आरक्षण (उच्च शिक्षणासाठी प्रवेश) लागू करण्याचा निर्णय घेतला. 2010 ला यूपीए सरकारने जातीय जनगणनेकरिता पावले उचलली. तत्कालीन कायदेमंत्री वीरप्पा मोईली यांनी 2011 मध्ये जनगणनेत जातींची आकडेवारी संकलित करण्यासंबंधी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्याशी पत्रव्यवहार केला. पण चिदंबरम यांनी त्याला विरोध केला. मनमोहन सिंग सरकारने पर्यायी एक संपूर्ण सामाजिक आर्थिक जाती जनगणना (एस इ सी सी) आयोजित करण्याचा निर्णय घेतला. 2011 ला ग्रामीण आणि शहरी भागात जनगणना आयोजित करण्यात आली होती. एस एस सी सी डाटा ग्रामीण विकास आणि निवास तथा नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने डाटा प्रकाशित केला. त्यानंतर मात्र तो डाटा उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकीय आरक्षणाचा पेच निर्माण होऊन जातवार जनगणनेची निकड अधोरेखित होऊ लागली. त्यामुळे देशभर ओबीसी जातीनिहाय जनगणनेचे लोण पसरत गेले. निवडणुकांमध्ये राजकीय वातावरण तापू लागले. 2019 च्या निवडणुकीपूर्वी ओबीसींची जातीय जनगणना करण्याचा निर्णय सरकारने घेतला. ओबीसींना एकप्रकारे आकृष्ट करण्याचा तो प्रयत्न होता. हेच त्याचे फलित निघाले. निवडणूक सरली, ओबीसींची जातीय जनगणना थंड बस्त्यात पडली. अलिकडेच बिहार विधानसभा निवडणुक पार पडली. त्यापूर्वी देखील ओबीसी जनगणना करण्याचे गाजर दाखवण्यात आले. तथापि प्रत्यक्ष नियमित जनगणना प्रक्रिया सुरू होण्याची वेळ आली असता, जनगणनेत 'ओबीसींचा जातीचा रकाना नाही!' ही बाब ओबीसी विचारवंत, अभ्यासक आणि आंदोलकांच्या ध्यानात आली आणि पुन्हा 'ओबीसींची जातीय जनगणना करा!' अशी मागणी जोर धरू लागली. ओबीसींच्या जनगणनेतून आमचे हीत साधले गेले पाहिजे. ओबीसींचे हक्क मिळाले पाहिजे. असा आवाज बुलंद होऊ लागला आहे. ओबीसीची जातवार जनगणना केल्याने हिंदूंचे हीतच होणार आहे. ओबीसी हिंदू असल्यामुळे जातवार जनगणनेतून त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासनातील सहभाग इ. स्थिती लक्षात येईल. त्यासाठी ओबीसीची जातवार जनगणनेची मागणी आहे. एससी, एसटीची जनगणना होत असून त्यांच्यासाठी अनेक तरतुदी होतात, तशा सोयी ओबीसीसाठी करता याव्या म्हणून ओबीसी जातवार जनगणनेची आग्रही मागणी पुढे आलेली आहे, जोर धरत आहे. ओबीसीची लोकसंख्या पन्नास टक्केपेक्षा अधिक आहे. हिंदू धर्माचा अर्धा हिस्सा आहे. एवढा मोठा समाज विकासापासून वंचित राहू नये म्हणून त्याच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णयासाठी जातवार जनगणना करून अनेक उपाययोजना करता येईल. त्यातून या हिंदूजनांचा उत्कर्ष शक्य आहे. असे ओबीसीमधील जागृत बांधवांना वाटते. सोबतच ओबीसीची नव्हे तर संपूर्ण समाजाचीच जातवार जनगणना हितकारक आहे. ईडबल्यूएस मधील हिंदूंचीही स्थिती लक्षात येईल. हिंदूहितैषी सर्वांनी जातवार जनगणनेची मागणी करणे देशाच्या फायद्याचे ठरेल. ओबीसींची जनसंख्या किती? निरक्षरता, बेरोजगारी, गरीबी ओबीसीत किती? मोठमोठ्या अब्ज-कोटी उलाढालीच्या मंदिरात पुजारी, धर्मगुरु, कुंभमेळात साधू किती? नोकरीत क्लास वन, क्लास टू ओबीसी किती? मंत्रालय, राजभवन, न्यायालय, सचिवालयात उच्चपदावर, कुलगुरू, किती? श्रमजीवी, मजूर, सालगडी, अल्पभूधारक शेतकरी, मजुरमहिला, झोपडीवजा निवासी, अल्पवयीन विवाहित, क्लास थ्री, फोर श्रेणीत नोकर, यांची मोजदाद जनगणनेत व्हायला हवी. याचा थेट संबंध ओबीसींसाठी धोरणात्मक निर्णय घेताना येत असल्याचे वास्तव समोर आले आहे. मंडल आयोगाच्या अहवालानुसार 52 टक्के लोकसंख्या ओबीसीची होती. पण राष्ट्रीय सर्वेक्षण 2006 नुसार हा आकडा घटून 41टक्केपर्यंत आला असे मानले जाते. त्यामुळे ओबीसीच्या आरक्षणासंबंधी राखीव जागा संबंधी अनेक प्रकरणी ओबीसी प्रश्नाचा गुंता सुटत नाही आणि म्हणून वारंवार ओबीसीच्या जनगणनेचा भडका देशभर उडालेला आहे. गेल्या दोन दशकांत ओबीसी जातींची जनगणना करण्यासाठी प्रचंड लढा चालू आहे. पण जातवार जनगणना केली जात नाही. या लढ्याचा 'वन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा, होण्या ओबीसी जनगणना!' अशी ओबीसींना ओबीसी आर्त हाक मारत आहे. कारण ओबीसी जनगणना करण्यासाठी घाबरणारा आणि ओबीसींचा मंडल आयोग लागू करणारे सरकार पाडणारा यांचा डीएनए सारखाच आहे. ■ ■



अनुज हुलके,
9823883541

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

## वेळीच सुधारणा करा!

माणूस हा चुकांचा पुतळा आहे असे म्हटले जाते. त्याचेकडून कळत न कळत काही चुका होत असतात. पण वेळीच त्यांना सुधारणे आवश्यक असते. समजा कुणी चूकुन एखाद्या चुकीच्या रेल्वेत बसला तर त्याने सर्वप्रथम येणाऱ्या स्टॉपवर ऊतरणे त्याच्या हिताचे असते. तो जेवढा जास्त काळ त्या गाडीत प्रवास करेल तेवढा जास्त त्रास त्याला परतीच्या प्रवासात सोसावा लागतो. तसेच नकारात्मक विचारांचेही आहे. जेव्हा हे नकारात्मक विचार मनात येतात तेव्हाच त्यांना संपवायला हवे. कारण ते जेव्हा जन्म येतात त्या क्षणातच ते सर्वाधिक कमजोर असतात. चुक असो की नकारात्मक विचार यांचा त्याग करायला मागेपुढे बघायचे नसते. हे सर्व सहज शक्य आहे. कारण कोणत्याही व्यक्तीत शक्तीची कमतरता नाही, कमतरता असते ती फक्त दृढनिश्चय आणि संकल्पाची. माणसाने आस्तिक किंवा नास्तिक यापैकी काही नसले तरी चालेल पण त्याने आपल्या जीवनात वास्तविक असणे गरजेचे आहे. जे चांगले असेल ते ग्रहण करावे, जे वाईट असेल त्याचा त्याग करावा. मग ते कर्म असो वा धर्म किंवा व्यक्ती असो. चुक आणि नकारात्मक विचारांचा त्याग यासाठी आवश्यक असतो की, त्यामुळे आपल्या जवळच्या व्यक्तींना त्रास होऊ शकतो तसेच ते आपल्या पासून लांब जाऊ शकतात. 'बीना दर्द के आँसू भी नहीं जाते, बीना प्यार के, रिश्ते भी निभाए नहीं जाते, जिंदगी में एक बात जरूर याद रखना, किसी अपने को रुलाकर, जिंदगी के सपने सजाए नहीं जाते.' ■ ■

बहुजन सौरभ

## बहिष्कृत भारत समतेच्या संघर्षाची ज्योत



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 03 एप्रिल 1927 रोजी सुरू केलेले 'बहिष्कृत भारत' हे एक महत्त्वपूर्ण पाक्षिक (पत्रिका) होते. या पत्रिकेचे संपादन स्वतः डॉ. आंबेडकर यांनी केले आणि समाजातील वंचित, पीडित व बहिष्कृत घटकांच्या आवाजाला एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून दिले. 'बहिष्कृत भारत' च्या पहिल्याच अंकात डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीवर तिव्र भाष्य केले आहे. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, सुधारणांचे कायदे अस्तित्वात आले असले तरी त्यांची अंमलबजावणी बहिष्कृत वर्गाच्या हितासाठी होत नव्हती. सत्तेचा काही भाग इंग्रजांकडून उच्चवर्णीय भारतीयांच्या हाती गेला, परंतु त्यांनी बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्षच केले. डॉ. आंबेडकरांनी अत्यंत प्रभावी शब्दांत मांडले की, बहिष्कृत समाजाची अवस्था पूर्वीपेक्षा अधिक दयनीय झाली असून त्यांच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्यासाठी स्वतंत्र वृत्तपत्राची गरज अधिक तीव्र झाली आहे. त्यांनी इशारा दिला की, जर बहिष्कृत वर्गाला त्यांच्या लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व मिळाले नाही, तर त्यांच्या उन्नतीचा मार्ग पूर्णपणे बंद होईल. या पार्श्वभूमीवर 'बहिष्कृत भारत' हे केवळ एक वृत्तपत्र नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनाचे, जागृतीचे आणि संघर्षाचे प्रभावी साधन होते. या पत्रिकेद्वारे डॉ. आंबेडकरांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अत्याचारांविरुद्ध निर्भीडपणे लेखन केले. 'बहिष्कृत भारतचे एकूण 34 अंक प्रकाशित झाले असून त्यामध्ये सुमारे 145 लेखांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' आणि 'समता' यांसारखी अन्य वृत्तपत्रेही सुरू करून समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने पुढे नेले. आज 'बहिष्कृत भारत' चा वर्धापन दिन साजरा करताना, डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या समतेच्या, न्यायाच्या आणि स्वाभिमानाच्या विचारांची आठवण करून त्यांना अभिवादन करण्याचा हा एक महत्त्वाचा दिवस आहे. ■ ■

सुकुशल य. ना. पाटील
मो. 7499188523

## डॉ. बाबासाहेबांचा विवाह आणि ऐतिहासिक भायखळा मार्केट

भीमराव रामजी आंबेडकर ( डॉ. बाबासाहेब आंबेडकर ) व रमा भिकू धोत्रे (रमाई) यांचा विवाह दिनांक 4 एप्रिल 1906 रोजी भायखळा मार्केट येथे संपन्न झाला. भायखळा मार्केटला एक इतिहास आहे तर भीमराव - रमाई यांनी नवा इतिहास तयार केला आहे. रमाई यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी भिकू धोत्रे होते. ते दाभोळ जवळील वणंद येथील महारपुरा वस्तीत राहत होते. भिकू धोत्रे हे दाभोळ बंदरात माशांनी भरलेले टोपले बाजारात आणण्याचे काम करीत असत. हे काम तसे कष्टाचे व कमी मजुरीचे होते. त्यांना दम्याचा मोठा आजार होता. लहानपणीच रमाईच्या आई वारल्या, वडील दम्यामुळे लवकरच वारले. त्यामुळे त्यांचे काका वलंगकर व मामा गोविंदपुरकर त्यांना मुंबई येथील भायखळा मार्केट येथील त्यांच्या घरी घेऊन आले. त्या काळातील अस्पृश्य समाजाचे प्रसिद्ध पुढारी गोपळबाबा वलंगकर यांच्या नाते संबंधात भिकू धोत्रे असल्याने या कुटुंबास सामाजिक चळवळीचे भान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी बाबा आता मुंबई येथील लोवर परेल येथील डबक चाळीत ( बी.आय. टी. चाळ रूम नंबर 50 - 51) राहायला आले होते. रामजी बाबा त्यांच्या मुलाकरीता (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या करिता) मुलगी शोधत होते. भायखळा मार्केट येथे राहत असलेल्या वलंगकर यांच्याकडे मुलगी असल्याचे त्यांना समजते. ते मुलीची माहिती काढतात तेंव्हा मुलीला आई वडील नसल्याने काका वलंगकर मुलीचा सांभाळ करीत असल्याचे तसेच ते अतिशय गरीब परिस्थितीचे असल्याचे त्यांना समजते. रामजी बाबा वलंगकर यांचेकडे रमाला बघायला जातात. रमाची अधिक विचारपूस करून ते रमाचा स्वभाव, आवड - निवड जाणून घेतात व मुलगी पसंत असल्याचे सांगतात. मुलगी पसंत पडल्याने त्यांनी साखरेची पुडी रमाच्या हातात दिली. रमाच्या काकाने व मामाने सुद्धा लग्नास होकार दिला. लग्नाची तारीख 4 एप्रिल 1906 निश्चित करण्यात आली. हा विवाह भायखळा मार्केट येथे आयोजित करण्यात आला. भायखळा मार्केट हे मुंबईतील



पहिले भाजी मार्केट आहे. 1846 पासून येथे भाजी बाजार भरत आला आहे, आधी हा बाजार मेहेर मंडई म्हणून ओळखला जात असे. धोंडाजी कृष्णाजी मेहेर हे शेतकरी इथे भाजी लागवड करत व इथेच विकत असत. त्यामुळे त्यांच्या नावाने हा भाजी बाजार ओळखला जाऊ लागला. 1857 मध्ये इथे रेल्वे स्टेशन सुरू झाले आणि या भागाचा कायापालट झाला. त्यामुळे हा बाजार 1857 ला भायखळा मार्केट म्हणून नावारूपास आला. हे भाजी मार्केट मुंबईतील भाजीपाल्याची गंगोत्री म्हणून ओळखले जाते. या भाजी मार्केट समोरील रस्त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आहे. याच मार्केटमध्ये भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचा भाजी विक्रीचा मोठा व्यवसाय होता. ते महात्मा फुले यांचे अनुयायी असल्याने त्यांनी सत्यशोधक चळवळीचे मोठे कार्य केले आहे. ते कामगार नेते असल्याने व भायखळा मार्केट हे व्यापारी, गाडीवाले, मजूर यांचेशी संबंधित असल्याने तसेच लगतच गिरणी कामगार मोठ्या संख्येने असल्याने त्यांची इथे मोठी चळवळ होती. सत्यशोधक चळवळीचा मुंबईतील बालेकिल्ला म्हणूनही या मार्केटची ओळख होती. कोल्हापूर प्रकरणी गोपाळ गणेश आगरकर यांना अटक झाली असता त्यांची जेलमधून सुटका झाली तेंव्हा नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाच्या तर्फे आगरकर यांचा 1882 मध्ये भव्य सत्कार याच भाजी मार्केटमध्ये केलेला आहे. शिवचरित्र लिहिणारे पुरंदरे यांचा कोशिंबीरचा व्यवसाय इथेच होता. शिवचरित्र हे पुस्तक इथेच लिहिले गेले असे सांगितले जाते. पुढे दलीत पँथरचे नेते, विद्रोही महाकवी नामदेव ढसाळ यांनी पाटीवाल्यांची युनियन याच मार्केटमध्ये निर्माण केली. आज इथे 333 भाजी विक्रीची दुकाने आहेत. मुंबई बाहेरून रोज 150 ट्रक्स खाली होत असतात. 365 दिवस हा बाजार सुरू असतो. सकाळचे चार ते रात्रीचे दहा वाजेपर्यंत हा बाजार अतिशय गजबजलेला असतो. भायखळा येथील भाजी मार्केट हे भाजीपाला व फळे करिताच आहे. इथे मासे व अन्य पदार्थांची खरेदी विक्री होत नसते. हे मार्केट 1857 पासून विस्तारित, सुशोभित करण्यात आले आहे. पुढील 49 वर्षांनी म्हणजेच 1906 मध्ये डॉ. बाबासाहेब व रमाई यांचा विवाह याच ठिकाणी झाला. त्यामुळे त्यांच्या विवाहस्थळास एक ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. एखाद्या ऐतिहासिक ठिकाणी आपला विवाह होणे ही सुद्धा आपल्या जीवनातील मोठी घटना असते. अशी मोठी घटना प्रत्येकाच्या जीवनात येतेच असे नाही. विवाहप्रसंगी डॉ. बाबासाहेबांचे वय 14 तर रमाईचे वय 9 वर्षाचे होते. रमाबाईचे काका, मामा याच मार्केटमध्ये गेल्या अनेक वर्षापासून भाजीचा व्यवसाय करीत असल्याने तशी त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. विवाहसोहळा अतिशय साधा झाला असेल मात्र एका ऐतिहासिक स्थळावर संपन्न झाल्याने त्यास अनन्यसाधारण महत्व आहे. पुढे भीमराव हे बोधिसत्व, संविधानाचे शिल्पकार होतात तर रमा या देशातील कोट्यावधी दीन दीनदलितांच्या आई अर्थात रमाई होतात. हा विवाह या ऐतिहासिक स्थळाच्या इतिहासात नोंदविला गेला. आज या विवाहास 120 वर्षे होत आहेत. या विवाहाचे एखादे स्मारक तिथल्या व्यापारी, मजूर वर्गाने उभारले तर त्यांच्या प्रेरणेतून या स्थळाच्या इतिहासाला एक सोनेरी पान लाभेल. अर्थात डॉ. बाबासाहेबांचा व रमाईचा विवाह तमाम जनतेस नेहमीच प्रेरणा देत राहील. ■ ■



जयसिंग वाघ
मो.9881928881

## रिपब्लिकन झंझावात : ॲड. मा. मा. येवले

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र चळवळीतील धेय्यनिष्ठा वाटचालीच सिंहावलोकन करताना कृतार्थतेचे समाधान ज्यांच्या वाट्याला येते, अशी व्यक्तीमत्व समाजालाही भूषणावह ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या मुक्ती संगराची धग उरात घेऊन त्यांच्या चळवळीला सर्वस्व समर्पित करण्याची जिद्द अंगीकारली अन् सुसंस्कारांची न सरणारी शिदोरी पाठीशी असली म्हणजे अंगिकारलेला वसा शिरोधार्य मानून जगताना श्वासात सुगंध आणि ध्यासात आनंद संम्मिलित होतो.**

मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांनी पोलीस अधिकाऱ्यांना 'गो स्लो'चा आदेश दिला. ही बाब जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ॲड. मा. मा. येवले यांच्या निदर्शनास आणून दिली. मामांनी ही गोष्ट दादासाहेब रा. सू. गवई साहेब यांच्या कानावर घालून विदर्भात जोपर्यंत आंदोलन पेटणार नाही तोपर्यंत मराठवाडा शांत होणार नाही, असे दूरध्वनीवरून सांगितले. दादासाहेब गवईंनी मामांना तत्काळ मुंबईस बोलावून घेतले. दादासाहेब गवईंनी नागपूर येथील रिपब्लिकन कार्यकर्ते श्री. वा. कों. गाणार आणि श्री. सदानंद फुलझेले यांना सांगून विदर्भात मराठा विरुद्ध ओबीसी असे आंदोलन उभे केले. विदर्भ पेटत असल्याचे पाहून मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांनी पोलीस अधिकाऱ्यांना 'शुट ॲट साईट' असे निर्देश दिले. मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांनी यावेळी दुटप्पी भूमिका घेतली होती. त्यामुळे मराठवाड्यातील आंदोलन शांत झाले. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठचे नामांतर 16 वर्षे लांबणीवर पडले. मध्यममार्ग शोधण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या संदर्भात डॉ. बापूसाहेब काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. रिपब्लिकन चळवळीतील योगदानामुळे दादासाहेब रा. सू. गवई साहेबांच्या शिफारशीने महाराष्ट्र शासनाने ॲड. मा. मा. येवले यांची डॉ. बापूसाहेब काळदाते समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्यातूनच पुढे 16 वर्षांच्या प्रदीर्घ आंदोलनाची दखल घेऊन मराठवाडा विद्यापीठाचे दि. 14 जानेवारी 1984 रोजी औरंगाबाद येथे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' आणि नांदेड येथे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' अशी दोन विद्यापीठे महाराष्ट्र शासनाने स्थापन केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हेच नाव 1978 साली महाराष्ट्र विधानमंडळाने मंजूर केलेले होते. केवळ दलित पँथरच्या अक्कल शुन्य नेतृत्वामुळे आंबेडकरी अनुयायांचे 16 वर्षांचे श्रम वाया गेले. याची खंत ॲड. मा. मा. येवले यांना आहे. आपल्या तहहयात व्रतस्थ राहण्याचे गुढही ते स्वतःच दिलखुलासपणे उकलतात. 'एका मुलीचा बाप प्रेमाच्या आड आल्याने मी, निराश झालो. त्यानंतर एका मुलीशी सोयरिक जुळली. बोलाचालीत काही किरकोळ देणेघेणे ठरले. परंतु त्याला 'हुंडा' हे नाव दिले गेले व त्याची सर्वत्र चर्चा झाली. ते मला पसंत पडले नाही. अखेर सोयरिक तुटली. नंतर एक पोट जातीची, दुसरी न्हावी पदवीधर (नाशिक), तिसरी लेवा पाटील समाजाची डॉक्टर (जळगाव) अशा तीन मुली आईवडिलांना पसंत पडल्या नाहीत. अशातच दोन बहिणींची व चार भावांची लग्ने हुंडा न घेता व न देता पार पडली. त्यातूनच माझ्या लग्नाचे वय निघून गेले.'

रिपब्लिकन नेते ॲड. मा. मा. येवले यांच्या वयाला 75 वर्षे पूर्ण होत असल्याने त्यांचा अमृतमहोत्सवी सत्कारासाठी समितीचे गठण सामाजिक कार्यकर्ते स. लड्डूसिंघ महाजन यांच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र चळवळीत कार्य करतांना डॉ. बाबासाहेबांच्या रक्ताच्या नात्यातील वारसदार सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात 1971च्या नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत आणि नातू ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात 1987च्या नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत निवडणूक लढवली किंवा प्रचार केलेला असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घराण्याशी एकनिष्ठतेची, श्रद्धेची व आदराचीच भूमिका येवले कुटुंबियांची राहिलेली आहे, हे



दर्शविण्यासाठी ॲड. मा. मा. येवले अमृतमहोत्सव समितीच्या वतीने ॲड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांना निमंत्रण देण्याचे ठरले. ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना आमंत्रित करण्यासाठी त्यांची तारीख व वेळ घेऊन अकोला येथे दि. 28 डिसेंबर 2013 रोजी कवी प्रा. रविचन्द्र हाडसनकर, सामाजिक कार्यकर्ते सुखदेव चिखलीकर, पत्रकार विजय निलंगेकर आणि विकास गजभारे, प्रकाश येवले, वसंत हाटकर आणि वाहन चालक संदीप सावंत हे शिष्टमंडळ गेले. अकोला येथे ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थानी दुपारी 2.00 वाजता ॲड. बाळासाहेब आंबेडकरांची भेट झाली आणि त्यांना ॲड. मा. मा. येवले अमृतमहोत्सवी सत्काराचे आमंत्रण स्वरुपात निवेदन दिले. निवेदनाचे वाचन करुन ॲड. बाळासाहेब आंबेडकर म्हणाले, 'नांदेडचा पराभूत इतिहास सांगण्यासाठी मी, नांदेडला येऊ काय?' असा प्रतिप्रश्न करुन 'मी, सत्काराला येणार नाही!' असे निक्षून सांगितले. यावेळी संपूर्ण आंबेडकरी चळवळीचे नेते या नात्याने ॲड. बाळासाहेब आंबेडकरांनी मनाचा मोठेपणा दाखवून रिपब्लिकन चळवळीतील नेत्याच्या सत्काराला उपस्थित राहणे यथोचित ठरले असते. परंतु त्यांनी नकार दिला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुतणे मुकुंदराव आंबेडकर यांचे चिरंजीव तथा भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष अशोकराव आंबेडकर यांना अमृतमहोत्सव समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात आले, त्यांनी त्याचा स्वीकार केला आणि ॲड. मा. मा. येवले यांचा भव्यदिव्य असा अमृतमहोत्सवी सत्कार स्वातंत्र्य सैनिक प्रभाकरराव हिंगोले नगरी, डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष स. लड्डूसिंघ महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष मा. अशोकराव आंबेडकर, माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, डॉ. बाबासाहेबांचे पणतू राजरत्न आंबेडकर, आ. डी. पी. सावंत, रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. राजेंद्र गवई, आ. ओमप्रकाश पोकर्णा, आ. वसंतराव चव्हाण, महापौर अब्दुल सत्तार, रिपब्लिकन नेते प्रा. बाबा हातेकर धूळे, नांदेड नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष रामनारायण काबरा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. मा. मा. येवले यांच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याची दखल घेऊन दि. 4 फेब्रुवारी 2014 रोजी महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री वसंतराव नाईक समाज भूषण पुरस्कार 2014' हा पहिला आणि शेवटचा एकमेव पुरस्कार मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहिम के. शंकर नारायणन् यांच्या शुभहस्ते सामाजिक न्यायमंत्री ना. शिवाजीराव मोघे आणि राज्यमंत्री ना. संजय सावकारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲड. मा. मा. येवले यांना देऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात सन 2013-14 या आर्थिक वर्षातील शैक्षणिक संस्थांना दिला जाणारा 'महात्मा फुले, छत्रपती शाहू आणि डॉ. आंबेडकर पुरस्कार 2014' हा प्रथम पुरस्कार 'प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नागपूर' या कॉलेजला देण्यात आला. हा पुरस्कार दीक्षाभूमी स्मारक समितीचे सचिव श्री. सदानंद फुलझेले, विश्वस्त ॲड. मा. मा. येवले आणि डॉ. सुधीर फुलझेले यांनी राज्यपाल महामहिम के. शंकर नारायणन् यांच्या शुभहस्ते स्वीकारला. संस्था स्वरूपात आणि वैयक्तिक स्वरूपातील महाराष्ट्र शासनाचे दोन पुरस्कार एकाच वेळी ॲड. मा. मा. येवले यांना शासनाच्या वतीने देऊन गौरवान्वीत करणे ही बाबच ॲड. मा. मा. येवले यांच्या सामाजिक कार्यातील निःस्पृहतेची पावती अर्थात 'राजमुद्रा' होय. राजकारणात राजकीय नेते कधीच एकाच राजकीय पक्षात निष्ठेने राहिलेले पहावयास मिळत नाहीत. सदैव ते एका पक्षातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून या पक्षात अशा प्रकारे पक्ष बदलत असतात. परंतु ॲड. मा. मा. येवले यांनी त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकल्पित 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' पक्षात एकनिष्ठ राहून दलबदलूपणा केलेला नाही! म्हणून अशा निष्ठावंत नेत्याची खडतर अशी संपूर्ण राजकीय कारकिर्द नांदेडच्या निर्मल प्रकाशन मार्फत प्रकाशित 'रिपब्लिकन झंझावात' ॲड. मा. मा. येवले' या चरित्र ग्रंथात मी स्वतः नमूद करुन हा ग्रंथ दि. 21 जानेवारी 2022 रोजी प्राचार्या डॉ. कमलताई रामकृष्ण गवई यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आलेला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चितेला साक्ष ठेवून तहहयात वृत्तस्थ राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र चळवळीला आपले जीवन समर्पित करणारे अन् निर्विकारपणे रिपब्लिकन चळवळीत संघर्षमय अन् सदोदित जीवन व्यतीत करणारे नेते महाराष्ट्र शासन सन्मानित, 'मुख्यमंत्री वसंतराव नाईक समाजभूषण' ॲड. मा. मा. येवले यांच्या निर्वाण समयी दि. 26 मार्च 2024 रोजी त्यांना 'रिपब्लिकन झंझावात - ॲड. मा. मा. येवले' अशा बिरुदावलीने त्यांना गौरवान्वीत करणे हीच खरी भावपूर्ण श्रद्धांजली आणि आदरांजली ठरेल! ■ ■

प्रा. रविचन्द्र हाडसनकर
मो. 9860203436

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### रास्वसंघ, हिंदुत्व व लोकशाही

खरे तर राष्ट्रीय स्वयं सेवक संघ म्हटले तर ढोबळ मानाने राष्ट्राच्या म्हणजे देशाच्या हितासाठी तयार करण्यात आलेली स्वतः होऊन पुढे आलेली संघटना होय, असे होते. पण अलीकडे जर पाहिले तर देशात जातीय भेदभाव वाढत आहे. धार्मिक वाद वाढत आहे. देशावर कर्ज वाढत आहे. महागाई वाढत आहे. असे असतांना संघ हे निर्मित पक्षाला योग्य सल्ला देऊन देशात होत असलेला कल्लोळ थांबविण्यासाठी प्रयत्न करीत नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे भारतात असणाऱ्या लोकशाहीचे भवितव्य नेमके भविष्यात काय असेल सांगता येत नाही, ही खंत वजा भीती व्यक्त करण्यात आलेली असून लोकशाहीला मानणाऱ्या लोकांवर जास्त जबाबदारी टाकली आहे. ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार समजला त्यांनी जास्त परिश्रम घेऊन लोकशाही टिकविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे सांगून सतत जागृत राहून काम करण्याची अपेक्षा निवासी संपादिका प्रा. संध्या राजूरकर यांनी जनतेकडून केली आहे. त्यासाठी त्यांचे लिखाण आहे. माझा लेख महत्वपूर्ण दैनिक बहुजन सौरभमध्ये दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार. सन्मान पूर्वक जयभीम.

– अविनाश टिपले

### विविध लेख ज्ञानवर्धक असतात...

दैनिक बहुजन सौरभ मधील संपादकीय तसेच विविध लेख ज्ञानवर्धक असतात. आजच्या संपादकीय लेखातून संघावर बंदी घालण्याचा ट्रम्प सरकारची मागणी का करण्यात आली आहे याचे विवेचन केले आहे. समाजात समता, बंधुता वाढविण्यासाठी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर विचारांची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. अनिल वैद्य सरांच्या धर्मांतर विरोधी कायदा आणि न्यायशास्त्राचा दृष्टिकोन या लेखातून मौलिक माहिती मिळाली आहे. अनिल वैद्य सरांचे लेख प्रासंगिक आणि माहितीपूर्ण असतात. या कायद्याचे बारकावे, या कायद्याची सरकारला का घाई होत आहे, हा कायदा का करावा लागत आहे ई. माहिती दिली आहे. भीमराव परघोलमल, गौरव मानकर, जयंत रामटेके, अनिरुद्ध कांबळे यांचे लेख सुद्धा महत्वाचे आहेत. या कार्याला झोकून देणाऱ्या संपादक संध्या मॅडमचे खूप धन्यवाद.

- श्रीराम बनसोड

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प ११३

**स्वाभिमानाचे स्मरणशिल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आकोली, तह. कुही, जि. नागपूर**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे मुक्तीदाते असून आमचे आयुष्य त्यांनी फुलविले आहे ही भावना महादेवराव गजभिये यांच्या मनात आली. त्यांनी आपल्या प्रिय पत्नीच्या स्मृतिप्रित्यर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारला आहे. दिनविशेष कार्यक्रमाला सर्व लोक एकत्र येतात.

संवाद मित्र, मुकुंद मेश्राम,
9923522083

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरमधील सुविधांअभावी विद्यार्थ्यांचे आंदोलन; व्यवस्थापनाविरोधात संताप



**नागपूर :** उत्तर नागपूर येथील सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरमधील अभ्यासिका व इतर सुविधा विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे उपलब्ध होत नसल्याच्या निषेधार्थ आज विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन छेडले.

युवा नेतृत्व अतुल खोब्रागडे यांच्या नेतृत्वात पार पडलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या हक्कांसाठी एकजुटीने आवाज उठवला. विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावेळी अमित सवाई, संघपाल निकोसे, संघदीप बेलेकर, तन्मय वानखेडे, अभिजीत मेश्राम, आशिष संकाळे, आकाश रामटेके, विद्यानंद खोब्रागडे, आरजू कांबळे, राजन बागडे आदींसह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

आंदोलनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे : 150 विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या अभ्यासिकेत सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. अभ्यासिकेसाठी निश्चित व पारदर्शक दर ठरवून आर्थिक शोषण थांबवावे. विद्यार्थ्यांवर लादण्यात येणाऱ्या अनावश्यक अटी-शर्ती तात्काळ रद्द कराव्यात. व्यवस्थापनातील कथित गैरप्रकारांची चौकशी करून ते तात्काळ थांबवावेत. दरम्यान, कन्व्हेन्शन सेंटरचे व्यवस्थापन पाहणारे अतुल वासनिक यांच्यावर विद्यार्थ्यांनी गंभीर आरोप करत त्यांना तात्काळ पदावरून दूर करण्याची मागणी केली. त्यांच्या कामकाजामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

विद्यार्थ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, त्यांच्या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी हा लढा पुढेही सुरूच राहणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

# भोंदू बाबा अशोक खरातवर कारवाई आणि जादुटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

**नागपूर :** ज्योतिषी, बाबा, बुवा आणि राजकारणी, सरकारी अधिकारी, धनदांडग्या प्रभावशाली व्यक्ती यांची साठगाठ किती भयानक शोषणकारी असते याचे हादरवून टाकणारे चित्र ज्योतिषी भोंदूबाबा अशोक खरातच्या प्रकरणातून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समोर आले आहे. या प्रकरणाचा निःपक्षपाती तपास होऊन अशोक खरात आणि इतर गुन्हेगारांना कडक शासन झालेच पाहिजे तसेच पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी पुढील मुद्द्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नागपूरच्या वतीने पोलिस आयुक्त आणि पोलीस अधिक्षक नागपूर यांना करण्यात आली. पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करण्याचा शासनाचा निर्णय आहे. हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्यक्ष कार्यान्वित करणे आवश्यक आहे. पत्रकार, महिला, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांना सदर अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाचे सदस्य म्हणून जोडून घेऊन त्यांच्या नियमित बैठका झाल्या तर परिसरात चालणारे अघोरी



प्रकार वेळीच समोर येतील व त्यांना पायाबंद घालता येईल. त्यासाठी फक्त कागदावर असलेले हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष आपल्या जिल्ह्यात कार्यान्वित व्हावेत अशी आमची मागणी करण्यात आली. भोंदूबाबांसंदर्भातील तक्रारींची दखल घेणे भोंदूबाबा, ज्योतिषी यांनी शोषण केलेल्या पीडित व्यक्तींसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती एक हेल्पलाईन सुरू करत आहे. याद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे तथ्य तपासून अंनिस वेळोवेळी त्या तक्रारींची यादी पोलिसांना देणार आहे. तसेच सामान्य नागरिक व पीडित व्यक्ती या बुवा बाबांकडून होणाऱ्या शोषणासंदर्भात अंनिस कार्यकर्त्यांशी संपर्क साधत असतात. प्रत्येक जिल्ह्यातील अशा प्रमुख शोषणकारी भोंदू बुवाबाबांची यादी व शक्य असेल तेथे या संदर्भातील पुरावे असलेला पेन ड्राईव्ह अंनिसचे कार्यकर्ते जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या सुपूर्द करतील. त्याची योग्य ती दखल घेण्यात येईल अशी मागणी करण्यात आली. सोशल मीडियातून होणाऱ्या अंधश्रद्धा प्रसाराला अटकाव सोशल मीडियातून बाबा-बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या रील्सचा लोकांवर अक्षरशः भडिमार होत आहे. औरंगाबाद खंडपीठाच्या या संदर्भातील निर्णयाला अनुसरून शासनाने अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तातडीने तयार करायला हवी. यासाठी अपेक्षित असलेले सर्व सहकार्य अंनिसचे कार्यकर्ते आपल्याला करतील असे निवेदनात नमूद केले गेले. या निवेदन देताना राज्य कार्यकारणी सदस्य रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, जिल्हा प्रधान सचिव डॉ. सुनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष गौतम पाटील, देवानंद बडगे, मंगला गाणार, विजया ठाकरे, डॉ. विकास होले, दीप्ती नाईक, सुषमा शेवडे, डॉ. जयप्रकाश बोधी धोंगडे, विजय सुरवाडे, वर्षा सहारे, गडेकर आणि इतर उपस्थित होते.

## महत्वाचे

### शशिकांत हिंगोणेकर यांची जागतिक अंतर्भेदी कविता : प्रदीप पाटील



**जळगाव :** 'प्रतीक्षेचा शून्यकाल' आणि 'वर्तमान बोलत नाहीय सत्य' या शशिकांत हिंगोणेकर यांच्या दोन नव्या अंतर्भेदी कवितासंग्रहांचे अनौपचारिक प्रकाशन प्राईम पब्लिशिंग बुक्स, जळगाव यांचे वतीने प्राईम पब्लिशिंग हाऊसच्या सभागृहात प्रदी पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाले.या प्रसंगी बोलताना प्रदीप पाटील म्हणाले, शशिकांत हिंगोणेकर यांची कविता ही मराठी साहित्यात अधोरेखीत होतेय. त्यांच्या कवितेचे विश्व जागतिक आणि सार्वत्रिक आहे. होरपळलेल्या सभोवतालाशी ती भाष्य तर करतेच सभोवतालच्या विषम व्यवस्थेविरुद्ध ती सजगतेने लढते आहे.' असे प्रतिपादन या संग्रहाचे प्रकाशन प्रसंगी प्रदीप तुकाराम पाटील यांनी केले. या प्रसंगी कृष्णा पाटील आणि भूषण दांडगेसह मित्र परिवार उपस्थित होता.

### कवी सुमेध वासनिक यांच्या दोन हिंदी कवितासंग्रहाचे प्रकाशन




**नागपूर :** भावनांना हिंदी कवितांच्या माध्यमातून शब्दबद्ध करणारे सामाजिक जाणिवेचे संवेदनशील कवी सुमेध वासनिक यांच्या 'संवेदनाओं की प्रसव वेदनाऐं' आणि 'रूहानी' या दोन महत्त्वपूर्ण कवितासंग्रहाचे प्रकाशन रविवारी दि. 5 एप्रिल रोजी सायंकाळी 6:00 वाजता होत आहे. ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष राहतील तर सुप्रसिद्ध कवी, चिंतक डॉ. सागर खादीवाला हे प्रमुख अतिथी राहतील. प्रकाशन सोहळ्यात सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय हिंदी-उर्दू शायर जनाब अबरार काशिफ आणि वी.म.वी. महाविद्यालयाच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ. आभा सिंग विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सुमेध वासनिक यांच्या कवितेवर उपरोक्त मान्यवर अभ्यासपूर्ण भाष्य करतील. कार्यक्रमाचे संचालन महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी, सिनेकलावंत किरण काशीनाथ करतील.हा प्रकाशन सोहळा अर्पण सभागृह( पहिला माळा) विदर्भ हिंदी मोरभवन, झांशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे संपन्न होईल. कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन सुमेध वासनिक मित्र परिवाराने केले आहे.

### अमरनगरात ज्येष्ठ नागरिकांच्या वाढदिवस साजरा

**नागपूर :** अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळ अमरनगर यांचे वतीने मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर व सचिव वसंतराव इझनकर व विनोद दिगांबर हिरुळकर, विजय दादाजी सिंगरू, रमेश फकिरा जिल्हारे, प्रकाश नथुजी बावनकर, माधोराव शंकरराव शिरपूरकर, कुसुम नारायण कोल्हटकर, डॉ. राजेश कुऱ्हाडे, नरेंद्र मोरेश्वर दुरुगकर, रमेश लहूलकर, यांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम अमर नगराच्या हनुमान मंदिर सभागृहात नुकताच झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्यकारी अध्यक्ष दत्ता मेघे यांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता गणपतराव निंबाळकर, राजेश्वर डगरवार, धनराज भोयर, ॲड. अरमरकर, रामेश्वर कांबळे, रामकृष्णा बांगडे, कोहाड यांनी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमाला रामदास माहुरे, रासेकर, शोभा आगरकर, गौरखेडे, भोयर, ज्योती निंबाळकर, शेषराव ठाकरे, देवानंद दुधे, गौतम वरघट, धनराज भोयर, प्रकाश गोजे व इतर सभासद मोठ्या संख्येने हजर होते.

# प्रज्ञा बहुउद्देशीय संस्थेतर्फे 14 वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन



**नागपूर :** प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने 14 वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन - नागपूर 2026 याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. 05 एप्रिल रोजी बाबुराव धनवटे सभागृह, अंबाझरी मार्ग, नागपूर येथे पार पडणार आहे. या संमेलनामध्ये राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक यांच्या संमेलनात विविध साहित्य प्रकारांतील उत्कृष्ट कलाकृतींना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या संमेलनात विविध साहित्य प्रकारांतील उत्कृष्ट लेखकांना 'प्रज्ञा प्रेरणा पुरस्कार' तसेच इतर मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. कार्यक्रम रुपरेषा सकाळी 8.30 वा. ग्रंथ दिंडी 9 वा.उद्घाटन 10.30 वा. गझल मुशायरा दुपारी कवी कट्टा, गझल मुशायरा दुपारनंतर पुरस्कार सोहळा 5 वा. समारोप पार पडणार आहे. हे संमेलन शामसुंदर गावकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असून, कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. राज यावलीकर, स्वागताध्यक्ष डॉ. राजेंद्र केंगार, कवी संमेलनाध्यक्ष दीपक करगुंटकर, गझल मुशायरा अध्यक्ष अभि. किशोर मिश्रा, बापू दासरी, संमेलनाला अंजली डोळे, स्नेहा सुभेदार आणि संजय पवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. समन्वयक वसुधा येणकर, संचालन डॉ. यशवंत मस्के, अंजली वारकरी आणि अजित उबाळे करणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरचे मान्यवर साहित्यिक, कवी व कलाकार उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती प्रज्ञा बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक लीना देगलूरकर दिली आहे.

# 'वसंत मून पुरस्कार वितरण 5 एप्रिलला

**उल्हासनगर :** वसंत मून सोशल वेलफेयर फाउंडेशन यांच्या वतीने साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक व चळवळीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी प्रदान करण्यात येणारा 'वसंत मून पुरस्कार-2026' यंदा ज्येष्ठ विचारवंत व हिंदी-मराठी साहित्यिक प्रा. दामोदर मोरे यांना जाहीर केला आहे. हा पुरस्कार समारंभ रविवार, दि. 5 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 6 ते 9 या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तक्षशिला विद्यालय, सुभाष टेकडी, उल्हासनगर-4 येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस असणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून कल्पना सरोज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात 'वसंत मून (मराठी साहित्य आणि विचार विश्व)' या ग्रंथाचे प्रकाशन लेखिका डॉ. जलदा ढोके गाणार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रमुख उपस्थितीत श्याम दादा गायकवाड (संस्थापक अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सेक्युलर), डॉ. प्रकाश वाकोडे (माजी संयुक्त संचालक, छ्स्ल्ध्नक्र), महेश भारती (राष्ट्रीय कोषाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी), कमलेश सोनाळे (माजी अप्पर जिल्हाधिकारी), आय. एम. मोरे (माजी सहसचिव, महसूल), किरण सोनवणे (पत्रकार व विचारवंत), राज असरोंडकर (अध्यक्ष, कायद्याने वागा लोक चळवळ) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचे संयोजन डॉ. चंद्रकांत साळवे, प्रा. सिंधू रामटेके, दिगंबर हजारे (समन्वयक, बुद्ध विहार समन्वय समिती) व ॲड. प्रफुल्ल कोळी यांनी केले आहे. संचालन प्रफुल्ल केदारे करणार आहेत. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष अंजली चंद्रकांत साळवे, उपमहाप्रबंधक मिलिंद वसंत मून (स्न्न्ब्ब्) व आयोजक रोहित साळवे यांनी नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# बार्टीत रिझर्व्ह बँक स्थापना दिवस साजरा

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या वतीने 1 एप्रिल रोजी प्रादेशिक कार्यालयात रिझर्व्ह बँक स्थापना दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. आरबीआयची स्थापना ही डॉ. बाबासाहेबांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या ग्रंथातील आर्थिक सिद्धांतांवर आधारित आहे. हिल्टन यंग कमिशनसमोर त्यांनी दिलेल्या साक्षीमुळेच या मध्यवर्ती बँकेची संकल्पना प्रत्यक्षात आली. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा पाया कसा आहे, यावर या कार्यक्रमात प्रकाश टाकण्यात आला.याप्रसंगी बार्टीचे सा. प्रकल्प व्यवस्थापक अनिल वाळके, प्रकल्प अधिकारी हृदय गोडबोले, तुषार सुर्यवंशी, शीतल गडलिंग, सुनीता झाडे, सलमान शेख, नागेश वाहुरवाघ, सारीता महाजन, राहुल थोटे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आरबीआयच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला. 'आरबीआयच्या गौरवशाली इतिहासात डॉ. बाबासाहेबांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते, याचा आम्हाला अभिमान आहे,' अशा भावना बार्टीच्या अधिकारी, कर्मचारी वर्गाने व्यक्त केल्या. बार्टीच्या विविध योजनांमधील प्रशिक्षणार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि आरबीआयचे महत्त्व यावर यावेळी चर्चा झाली.

# महात्मा फुले शिक्षण संस्थेत सर्व जातीय, धर्मीय पुनर्विवाह परिचय मेळावा




**नागपूर :** महात्मा फुले शिक्षण संस्था रेशीमबाग, नागपूर येथे रविवारी 29 मार्चला सर्व जातीय, धर्मीय पुनर्विवाहास इच्छुक, घटस्फोटीत, विधवा, विधूर, प्रौढ, अपंग युवक-युवतीचा परिचय मेळावा नुकताच झाला. महात्मा फुले, सावित्रीआई फुले यांनी बहुजनांसाठी, दिन-दलित व सर्व मानव जातीसाठी कार्य केले. या महामानवांचा विचार जनसामान्य माणसांपर्यंत पोहचावा. या उद्धेशाने महात्मा फुले शिक्षण संस्थेने हा उपक्रम हाती घेतला. कार्यक्रमाला संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. अरुण पवार तर उदघाटक माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय किशोर रोही व प्रमुख पाहुणे धर्मदाय उपायुक्त किशोर मसने, माजी आमदार अशोक मानकर, गिरीष पांडव, शेखर सावरबांधे उपस्थित होते. यावेळी 'पुनःरबंध' परिचय पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. परिचय पुस्तिकेत 410 विवाह इच्छुक मुला मुलींची नावे नोंदणी असून 82 मुला - मुलींनी कार्यक्रमात परिचय दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पंकज कुरळकर तर प्रस्तावना कार्याध्यक्ष व समिती संयोजक प्रकाश देवते यांनी केले. आभार राजेंद्र पाटील यांनी मानले. याप्रसंगी उपाध्यक्ष गुलाब चिचाटे, रवींद्र अंबाडकर, रमेश राऊत, प्रा. मुकेश घोळसे, डॉ. प्रा. अभिजित पोतले, देवेंद्र काटे, नंदू कण्हेर, सुनील चिमोटे, मोहीत श्रीखंडे, राजेंद्र वाघे, शरद चांदोरे, संचालिका माधुरी गणोरकर, डॉ. अलका झाडे, शोभा लेकुरवाळे, सर्व जातीय व धर्मीय परिचय मेळावा समिती सदस्य सुभाष घाटे, गजेंद्र जाधव, ओंकारेश्वर गुरव, गजानन देऊळकर, नरेंद्र मोहिते, संजय केदारपवार, शालिकराम कुकडे, सुधाकर सार्वे, भैयालाल बिघाने, अनिल पुंजे, शंकर चुरागले, सुरेंद्र टिंगणे, महेंद्र क्षीरसागर, शिवा अरखेल, दिपक लखपती, प्रवीण सांदेकर, सुरेश पाठक, अजय तितरमारे, बाळासाहेब गायकवाड, पुरुषोत्तम कुथे, चंद्रकांत धांडे, अरुण टिकले, आनंद बानाईत, शंकर चौधरी, रंजना कडुकर व मोठ्या संख्येने सर्वजातीय व धर्मीय समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# आदिवासी बांधवांनी शिक्षणाच्या प्रवाहात येऊन आपली सर्वांगीण प्रगती करावी : छाया कुरुटकर



**नागपूर :** योग सखी बहुउद्देशीय संस्था व सुजाण सामाजिक बहुउद्देशीय विकास मंच नागपूरच्या वतीने गाव-कोहाना तालुकाद्व परतवाडा. जिल्हा अमरावती येथे आदिवासी बंधू भगिनींना कपडे व विविध वस्तूचे वाटप मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते केले. कोहाना गाव हे धारणी रोडवर असून निसर्गाच्या कुशीत वसलेल आहे. सर्वप्रथम समाज मंदिर येथे गावकरी मंडळींना आमंत्रित करून तेथील प्रमुख श्री बाजीलाल प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. खरपास, वाजिद भाई तसेच आदिवासी महिलांचा व पुरुषांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. छोटे खानी कार्यक्रमात संस्थेच्या सचिव व सामाजिक कार्यकर्त्या छाया कुरुटकर यांनी प्रबोधन करताना सांगितले की आदिवासी मुला-मुलींनी शिक्षण घेणे फार गरजेचे आहे. आपण शिक्षित झाल्यास आपला सर्वांगीण विकास होईल तसेच गावाचा सुद्धा विकास होईल.

सुजाण सामाजिक बहुउद्देशीय विकास मंचचे अध्यक्ष त्र्यंबक मोकासरे व सचिव राजेश हाडके यांनी आदिवासी बांधवांना शिक्षणाचे व संविधानाचे महत्त्व पटवून दिले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर खरपास यांनी आरोग्य विषय माहिती दिली.

याप्रसंगी मदन नागपुरे यांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. ओबीसी शरद वानखेडे यांनी संचालन व सामाजिक प्रबोधन केले. कोहाना येथील अंगणवाडीच्या प्रांगणात आदिवासी भगिनींना साड्या, सलवार सूट, वन पीस व गृहपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले. बांधवांना शर्ट, पॅन्ट, जॅकेट कोट इत्यादीचे वाटप करण्यात आले. लहान मुला-मुलींना पाणी बॉटल, शर्ट, पॅन्ट, जीन्स पॅन्ट इत्यादीचे वाटप करण्यात आले. उपस्थित सर्व मुला मुलींना खाऊचे वाटप केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगसखी व सुजाणच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

छाया वानखेडे, मेघा फेंडर, माधुरी लाडेकर, सुनंदा मोकासरे, रेखा कन्नाके, मनीषा बोरकर, विद्या लडके, कांचन राऊत, प्रियंका साठवणे, पुष्पा बनकर, योगिता कारेमोरे, निशा हटकर, संगीता नागपुरे, प्रतिभा वाणी, मीरा मदनकर, प्रवीण बालपांडे, कैलास कुरुटकर उमाकांत राऊत, नारायण लडके, निषाद कुरूटकर, आदित्य वानखेडे, मोनू राऊत, श्वेता खाइवले इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न घेतले.

## निधन वार्ता

### देविदास जांभूळकर



**नागपूर :** माजी नगरसेवक दीपक जांभूळकर यांचे मोठे भाऊ देविदास जांभूळकर राहणार रिपब्लिकन नगर, इंदोरा, नागपूर यांचे निधन झाले. त्यांच्यावर नारा घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सिद्धार्थ पांडुरंग लोखंडे



**नागपूर :** विदर्भ हाऊसिंग कालोनी, बाळाभाऊ पेठ निवासी सिद्धार्थ पांडुरंग लोखंडे (62)यांचे 1 एप्रिल 2026ला अल्पशा आजाराने निधन झाले. दि. 2 जानेवारी 2026 ला बारसे घाट (सिद्धार्थ नगर टेका)येथे अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात दोन मुली, पत्नी व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## खाण आणि विकासकामांचा कसा बसतोय फटका ?

# चंद्रपूर जिल्ह्यातील लाखो वर्ष जुन्या प्रागैतिहासिक स्थळांचे अस्तित्व धोक्याता





**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरानजीक असलेले पुरातन भटाळा मंदिर परिसर आणि चंद्रपूर शहरातील प्रागैतिहासिक पापामिया टेकडी या दोन महत्त्वाच्या स्थळांची दुर्दशा झाल्याची खंत इतिहासप्रेमी आणि संबंधित भागातील नागरिक व्यक्त करताना दिसत आहेत. इतकेच नाही तर याची दखल उच्च न्यायालयाने देखील घेतली आहे. मानवी उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या खुणा असलेले भटाळा परिसर अवैध दगडी खनन तर चंद्रपूर शहरातील पापामिया टेकडी परिसर विकासकामांच्या कचाट्यात सापडला असून त्याचा ऱ्हास होताना दिसत आहे. याचे कारण ठरतेय परिसराच्या अगदीजवळ पोहोचलेल्या दगडखाणी. या खाणींचा विस्तार आणि स्फोटांमुळे मंदिरासह हा पुरातत्त्वीय परिसर नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे इतिहासप्रेमींचे म्हणणे आहे. भटाळा मंदिर परिसराची अवस्था आणि दुर्दशा पाहता मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचने या संदर्भात स्वतःच जनहित याचिका (सुओ मोटो) दाखल करून घेतली. तर, चंद्रपूर शहरातील तब्बल दीड ते 2 लाख वर्ष जुन्या आणि महाराष्ट्रातील सर्वात जुन्या अश्मयुगीन प्रागैतिहासिक स्थळापैकी एक असलेल्या 'पापामिया टेकडी' टेकडीची स्थितीही दयनीय आहे. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यातील या स्थळांचे ऐतिहासिक महत्त्व काय? इतका समृद्ध वारसा लाभला असतानाही या स्थळाची अशी दयनीय अवस्था का होत असावी? प्रशासन आणि पुरातत्त्व विभागाचे म्हणणे काय, जाणून घेऊ या. विदर्भातील प्रसिद्ध भटाळा येथील प्रागैतिहासिक पुरातत्त्व स्थळ. वरोरा तालुक्यात असलेले भटाळा गाव ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे व सांस्कृतिक वारशाचे समृद्ध केंद्र आहे. पुरातत्त्वीय स्थळाला सुमारे दीड ते 2 लाख वर्षांचा समृद्ध प्रागैतिहासिक वारसा लाभला असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

# ओबीसी सहित सर्व जातींची जात निहाय जनगणना करा : ओबीसी जनमोर्चाचे निवेदन




**नागपूर :** तहसीलदार मौदा, जि. नागपूर मार्फत प्रधानमंत्री, भारत सरकार यांना 2026-2027 मध्ये होणाऱ्या जनगणनामध्ये ओबीसी सहित सर्वच जातींची जनगणना करण्यात यावी. करिता जातनिहाय जनगणना ओबीसीच्या न्याय हक्काचा एकमेव मार्ग आहे. भारताच्या लोकशाहीत जनगणना केवळ आकड्याचा खेळ नसून तो संसाधन वाटपाचा आणि सामाजिक न्यायाचा पाया आहे. 1 जानेवारी 2026 च्या राजपत्रानुसार जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली 1 एप्रिल 2026 पासून जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर सुचीकरण सुरुवात होत आहे. मात्र प्रश्नावलीत विचारल्या जाणाऱ्या 33 प्रश्नापैकी 12 व्या क्रमांकाच्या प्रश्नात कुटुंबप्रमुखाचे जातीचा वर्ग विचारताना केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती व इतर असे तीनच स्पष्ट पर्याय देण्यात आले आहेत. ओबीसीसाठी स्वतंत्र रकाना न ठेवता, त्यांना इतर या वर्गवारीत समाविष्ट करण्यात आले आहे. यामुळे ओबीसींची नेमकी लोकसंख्या किती? यांची शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती काय? याबाबत कोणताही अधिकृत डेटा सरकारकडे उपलब्ध होणार नाही. 1931 नंतर भारतात एकदाही पूर्णतः जात निहाय जनगणना झाली नाही. स्वातंत्र्यानंतर केवळ स्ट आणि स्त्र यांची जात निहाय जनगणना केली जाते, त्यामुळे येणाऱ्या जनगणनेमध्ये ओबीसी सहित सर्वच जातींची जात निहाय जनगणना करण्यात यावी. अन्यथा सदर जनगणनेमध्ये आमचा सहभाग राहणार नाही. अशा मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी निवेदन देतांनी ओबीसी जनमोर्चाचे जिल्हाध्यक्ष जगदिश वाडिभस्मे, रमेश वाघाळे, तुळशीराम बसेशंकर, राजू खवसकर, किशोर बोरकर, राजकुमार गेडाम, राजेन्द्र वासनिक, विजय मेहर, भगवान मेश्राम, बंडू महाले, कुलदीप लोणारे, योगेश गोंगले, डॉ. दिपंकार नगराळे, सागर बावणे, अशोक मेश्राम, संदीप सुर्यवंशी, विंध्येश्वर कुर्जेकर, मधुकर काळबांडे, विनोद कानफाडे, भाऊराव पाटील, विजय शेंडे बाबूलाल गजभिये, प्रकाश गजभिये, मधुकर कांबळे उपस्थित होते.

# खापरटोनमध्ये मातंग महिला सरपंचावर बहिष्काराचा आरोप; अविश्वास ठरावांमुळे तणाव वाढला



**बीड :** बीड जिल्ह्यातील खापरटोन ग्रामपंचायतीमध्ये मातंग समाजातील महिला सरपंच ज्ञानेश्वरी कोमले यांच्याविरोधात सातत्याने अविश्वास ठराव आणले जात असल्यामुळे गावात सामाजिक व राजकीय तणाव निर्माण झाला आहे. हा वाद केवळ राजकीय नसून जातीय भेदभावातून प्रेरित असल्याचा आरोप स्थानिक सामाजिक संघटनांनी केला आहे. माहितीनुसार, खापरटोन गावात मातंग समाजाचे केवळ एकच कुटुंब असून, आरक्षणाच्या माध्यमातून ज्ञानेश्वरी कोमले या सरपंचपदी निवडून आल्या आहेत. मात्र, त्या दलित समाजातील असूनही ठामपणे भूमिका मांडतात व पारदर्शक कारभारावर भर देतात, हे काहींना सहन होत नसल्याचे सांगितले जात आहे. सरपंच कोमले यांनी सुमारे 1 कोटी 21 लाख रुपयांच्या विकासकामांमध्ये अनियमितता असल्याचा संशय व्यक्त करून त्याला विरोध केला होता. तसेच, गेल्या अनेक वर्षांपासून एकाच ग्रामसेवकाची नियुक्ती असल्याने त्याच्या बदलीची मागणीही त्यांनी केली होती. या निर्णयांमुळे काही स्थानिक स्वार्थी गट नाराज झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, त्यांच्याविरोधात वारंवार अविश्वास ठराव आणून त्यांना पदावरून हटवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर, कोमले यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले असून न्याय मिळवण्यासाठी कायदेशीर लढा सुरू केला आहे. या प्रकरणात पोलिस प्रशासनाने अद्याप ठोस कारवाई केली नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. काही महिन्यांपूर्वी तक्रार दाखल करूनही त्यावर योग्य ती दखल घेण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सामाजिक संघटनांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी करत, संबंधित महिला सरपंचाला तात्काळ पोलीस संरक्षण देण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणात वेळेत हस्तक्षेप न झाल्यास मोठा सामाजिक संघर्ष उद्भवण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, राज्य सरकारने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरत आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648